RNI : MAHMAR/2022/88796

www.vidarbhkesari.com Vidabh Kesari News 90969 45629 @vidarbhkesari

vidarbhkesari21@gmail.com

दैनिक

# विदर्भ केसरी


विदर्भाचा मानबिंदू

मुख्य संपादक : अमोल कंटाळे

www.vidarbhkesari.com

अमरावती
५ सोमवार
जानेवारी २०२६
✽ वर्ष ५ ✽ अंक २२०
✽ पृष्ठ : ४ ✽ मूल्य रु : ३

## पण कुणाचा जीव घेऊ नका; अमित ठाकरे



■ सोलापूर महानगरपालिका निवडणुकीत उमेदवारी मागे घेण्याच्या कारणावरून मनसेच्या एका कार्यकर्त्याचा खून करण्यात आला. निवडणुका जिंकण्यासाठी भाजप कोणत्याही थराला जाऊ लागली आहे, तुम्हाला निवडणुका जिंकायच्या आहेत का? मग आम्ही सर्वजण माघार घेतो? तुम्ही निवडणूका जिंका? राज्याची वाट लावा? पण निष्पाप कोणाचेही बळी घेऊ नका असे भावनिक आवाहन मनसेचे नेते अमित ठाकरे यांनी सोलापुरात केले.

## तरुणाची रेल्वेखाली आत्महत्या

▸विदर्भ केसरी।

सातारा जिल्ह्यातील लोणंद परिसरात पोलिसात तक्रार देण्याच्या धमकीमुळे एका ३० वर्षीय तरुणाने रेल्वेखाली आत्महत्या केली. या प्रकरणी दोन महिलांसह सात जणांविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा येवलेवाडी पोलिसांनी दाखल केला आहे. आत्महत्या केलेल्या तरुणाचे नाव रामदास भरत पवार (वय ३०) असे आहे. शीतल काळे, अरविंद काळे, सतीश सरोदे, नितीन सरोदे, श्रुती कन्हेरे, ऋषी कन्हेरे आणि मोहन सोनार (सर्व रा. कोंढवा) अशी गुन्हा दाखल झालेल्या आरोपींची नावे आहेत. पवार यांची बहीण रुपाली संतोष पुजारी (वय ३३, रा. बाळासाहेबनगर, लोणंद, जि. सातारा) यांनी येवलेवाडी पोलित ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रामदास पवार हे कोंढव्यातील येवलेवाडी भागात असलेल्या शीतल ग्लॅमअप युनिसेक्स सलूनमध्ये कारागीर म्हणून काम करत होते. सलूनची मालकीण शीतल काळे हिच्याशी त्यांचा वाद झाला होता. आरोपींनी पवार यांना पोलिसांकडे तक्रार करण्याची धमकी दिली होती आणि तक्रार न करण्यासाठी त्यांच्याकडे पाच लाख रुपयांची मागणी केली होती.

## आरोपीची आत्महत्या

▸विदर्भ केसरी।

कुख्यात 'मोक्का' गुन्ह्यातील फरार आरोपी सादिक हुसेन कपूर (वय ५६, रा. सय्यदनगर, हडपसर) याने कॅम्प परिसरातील आपल्या कार्यालयात गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना शनिवारी सायंकाळी सहा वाजण्याच्या सुमारास उघडकीस आली. आत्महत्या करण्यापूर्वी सादिक कपूरने ३० ते ३३ पानांची सुसाईड नोट लिहिली आहे. या नोटमध्ये अजित पवारांच्या पक्षाचे उमेदवार फारूख शेख यांच्यासह अन्य काही व्यक्तींच्या नावांचा स्पष्ट उल्लेख करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली.

## वाहनाच्या धडकेत तरुणाचा मृत्यू!

▸विदर्भ केसरी। गुडाळ :

कळंकवाडी ता. राधानगरी येथील राहुल वसंत पाटील (वय 28) या तरुणाच्या दुचाकीला मुंबई - गोवा महामार्गावर महाड नजीक रविवारी पहाटे एक वाजण्याच्या सुमारास अज्ञात वाहनाने धडक दिल्याने राहुल आणि त्याची कंपनीतील सहकारी मैत्रीण कु. अनुष्का जालिंदर मानकर (वय 25) रा. येडेमच्छिंद्र असे दोघेही जागीच ठार झाले. रविवारी पहाटे या अपघाताचे वृत्त महाड पोलिसांनी कळंकवाडीत कळवल्यानंतर राहुल चे वडील आणि काही ग्रामस्थ तातडीने महाडकडे रवाना झाले. छोट्याशा कळंकवाडीवर या दुर्घटनेमुळे दिवसभर शोककळा पसरली होती. मात्र घरी एकट्या असलेल्या राहुल च्या आईला या अपघाताची ग्रामस्थांनी गंधवार्ताही लागू दिली नव्हती मुंबई पोलीस दलात असलेला राहुल चा कळंकवाडी येथील मित्र योगेश भोसले याला अपघाताची माहिती मिळताच मुंबईतून महाडला पोहचला आणि त्याने तेथील सोपस्कर पूर्ण करण्यास पाटील कुटुंबियांना आणि ग्रामस्थांना मदत केली.

# आईला शेवटचा कॉल केला अन्...;

### १२ वर्षीय शाळकरी मुलीच्या मृत्यूनंतर कुटुंबाचा आक्रोश



▸विदर्भ केसरी। लातूर -

शहरातील जवाहर नवोदय विद्यालयात सातवीमधील एका विद्यार्थिनीने वसतिगृहात टॉवेलने गळफास घेत आत्महत्या केल्याची घटना रविवारी सकाळी ८ वाजता समोर आली. अनुष्का किरणकुमार पाटोळे (वय १२, रा. टाका ता. औसा) असे मृत विद्यार्थिनीचे नाव आहे. मृत मुलीच्या कुटुंबीयांनी शाळेतील दोषींविरोधात खुनाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी करत संताप व्यक्त केला.

नातेवाईकांच्या आक्रोशाने दिवसभर रुग्णालय परिसरात तणावाचे वातावरण होते. रात्र झाल्याने मृतदेहाचे शवविच्छेदन करण्यात आले नाही. कुटुंबीयांनीही त्याला विरोध दर्शवत जोपर्यंत गुन्हा दाखल होत नाही, तोपर्यंत पार्थिव ताब्यात घेणार नाही अशी भूमिका घेतली. याबाबत रात्री उशिरापर्यंत कुठलाही नोंद झाली, नसल्याचे पोलिसांनी सांगितले. अनुष्काने जिथे गळफास घेतला त्या हॉलमध्ये दोन महिला कर्मचारी आणि १८ विद्यार्थिनी होत्या. कोणालाच कसे काय दिसले नाही? असा सवाल अनुष्काचे वडील किरणकुमार पाटोळे यांनी केला आहे.

# नातलगांचं चांगभलं! आमचं काय चुकलं?

### कार्यकर्त्यांचा प्रश्न: निवडणुकीत सग्यासोयऱ्यांचे राजकारण

▸विदर्भ केसरी। पिंपरी :



पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली आहे. मात्र सर्वच पक्षांनी खासदार, आमदार, महापौर, माजी पदाधिकाऱ्यांच्या नातेवाईकांना उमेदवारी दिली आहे. 'उमेदवारीत नातलगांचं चांगभलं; आमचं काय चुकलं?' असा सवाल कार्यकर्तेच करत आहेत.

पिंपरी-चिंचवडच्या राजकारणावर स्थानिक नेत्यांचे वर्चस्व आहे. महापालिका निवडणुकीत नेत्यांच्या नातलगांनाच उमेदवारी मिळत असल्याचा इतिहास आहे. भाजप, दोन्ही राष्ट्रवादी, शिंदेसेना, उद्धवसेना, मनसे, काँग्रेस अशा सर्व पक्षांनी उमेदवारी जाहीर केली आहे. मात्र, खासदार, आमदार, महापौर, स्थायी समिती अध्यक्ष, विरोधी पक्षनेते, सत्तारूढ पक्षनेता, नगरसेवक आणि पदाधिकाऱ्यांच्या मुलांना, पत्नी, नातलगांचा त्यात भरणा आहे. आम्ही फक्त सतरंज्या उचलायच्या का, असा सवाल कार्यकर्ते करत आहेत.

- ■ आमदार आणि महापौरपुत्रांना संधी
- ■ प्रभाग १ : मागीलवेळी सुरेश म्हेत्रे यांच्या सूनबाई स्विनल म्हेत्रे, तर आता स्वत:. दिवंगत माजी विरोधी पक्षनेते दत्ता साने यांचा मुलगा यश साने.
- ■ प्रभाग २ : माजी नगरसेवक बबन बोराटे यांचे पुतणे वसंत, माजी महापौर शरद बोऱ्हाडे यांचे पुतणे निखिल.
- ■ प्रभाग ४ : माजी नगरसेवक रामचंद्र गायकवाड यांचे पुत्र उदय गायकवाड.
- ■ प्रभाग ७ : माजी आमदार विलास लांडे यांचे पुतणे विराज लांडे, माजी आमदार ज्ञानेश्वर लांडगे यांचे पुत्र नितीन लांडगे.
- ■ प्रभाग ८ : माजी नगरसेवक संजय वाबळे यांची पत्नी अश्विनी वाबळे.
- ■ प्रभाग ९ : आमदार अण्णा बनसोडे यांचे पुत्र सिद्धार्थ बनसोडे, माजी विरोधी पक्षनेते कैलास कदम यांचे बंधू सद्गुरू कदम, माजी महापौर हनुमंतराव भोसले यांचे पुत्र राहुल भोसले, माजी नगरसेवक समीर मासुळकर यांची पत्नी शीतल मासुळकर.

## मद्य पाजण्यास नकार : मित्राचाच केला खून

▸विदर्भ केसरी। नागपूर

: राज्याचे मुख्यमंत्री आणि गृहमंत्री असलेल्या देवेंद्र फडणवीस यांच्या शहरात नव्या वर्षात पहिल्याच आठवड्यात कायदा व सुव्यवस्थेला गुंडांनी आव्हान दिले आहे. मद्य पाजण्यास नकार दिला म्हणून सहा जणांनी मिळून मित्रांवरच लोखंडी रॉडने केलेल्या प्राणघातक हल्ल्यात एकाचा गंभीर रक्तस्त्राव होऊन मृत्यू झाला. या जीवघेण्या हल्ल्यात आणखी चौघे जखमी झाले असून त्यापैकी दोघांची प्रकृती चिंताजनक आहे.

कळमना पोलीस हद्दीतील पर्वती नगरातल्या माझरी रेल्वे बोगद्याजवळ शनिवारी रात्री साडे आकराच्या सुमारास ही थरारक घटना घडली. रितिक सावनलाल पटले (२२) रा. पार्वती नगर, कळमना गाव असे जीवघेण्या हल्ल्यात खून झालेल्या तरुणाचे नाव आहे. तर यात सलिम शेख, शिवप्रसाद नागपुरे, संगीता, तनशू शिवप्रसाद हे चौघे जखमी झाले. यापैकी सलिमची प्रकृती चिंताजनक असल्याचे वैद्यकीय सूत्रांनी सांगितले.

ईशा हातिम अन्सारी (५५), मुस्तफा उर्फ गोलू ईशा अन्सारी, लुकमान ईशा अन्सारी (२२) साहिल ईशा अन्सारी (२०) सलाउद्दीन ईशा अन्सारी (१९), शाहिद उर्फ बबूआ इशा अन्सारी अशी मित्रांवरच लोखंडी रॉडने हल्ला करत खून केलेल्या सहा जणांची नावे आहेत.

■ घटनेच्या दिवशी शनिवारी रात्री रितिक पटले हा मित्र सलिम, तनशू आणि अन्य काही जणांसोबत पार्वती नगरातलल्या अनिकेत किराणा दुकानाजवळील घरासमोर बोलत उभे होते. त्यावेळी मुस्तफा तिथे आला. त्याने रितीकला मद्य पाजण्यासाठी आग्रह केला. रितीकने नकार दिल्यानंतर मुस्तफा तेथून निघून गेला. थोड्या वेळेनंतर मुस्तफा पुन्हा तिथे आला आणि रितिक व तनशूला सोबत घेऊन मद्य पाजण्यासाठी कांजी हाऊस चौकात आला.

■ दरम्यान मित्रामित्रांमध्ये चेष्टा मस्करी सुरू झाली. त्याचा राग आल्याने मुस्तफा रितिक आणि सलिमला माझरी रेल्वे बोगद्याच्या खाली सोडून निघून गेला. अखेर रितिक आणि सलिम घरी पायी जात असताना तुकलामने दोघांना दूरध्वनीवरून जीवे मारण्याची धमकी दिली. त्याच रस्त्यावरून जात असताना हे तिघेही एकमेकांसमोर आले. हा वाद विकोपाला गेल्याने सहा जणांनी चाकू आणि लोखंडी रॉडने प्राणघातक हल्ला सुरू केला. यात रितिक रक्ताच्या थारोळ्यात पडला.

## ९ गुन्हेगारांच्या टोळीवर मकोका

▸विदर्भ केसरी। बुलढाणा :

मलकापूर शहरात खून, प्राणघातक हल्ले, दरोडे व जबरी चोरीसारख्या गंभीर गुन्ह्यांचा उच्छाद मांडणाऱ्या संकेत उन्हाळे याच्यासह नऊ सराईत गुन्हेगारांच्या संघटित टोळीवर पोलिसांनी महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम १९९९ (मकोका) अंतर्गत कारवाई केली आहे. या कारवाईमुळे मलकापूर शहरातील संघटित गुन्हेगारीवर वचक बसून नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

संकेत सुनिल उन्हाळे (२२) याच्या टोळीत साहिल सुधाकर पालवे (१८), देव तिलकसिंग राजपूत (२४), अरविंद अजय साळुंके (१९), गणेश विजय वायडे (२१), कौशल संतोष घाटे (२२), आदित्य जनार्दन वानखेडे (२४), ऋषिकेश रामलाल इंगळे (२३) (सर्व रा. मलकापूर) तसेच हर्षल सुभाष घोंगटे (२३, रा. आव्हा, ता. मोताळा) यांचा समावेश आहे.

या टोळीने किरकोळ कारणावरून सतीश गजानन झाल्टे (रा. पिंप्राळा) या तरुणाची चाकूने भोसकून हत्या केली होती. तसेच या प्रकरणातील साक्षीदारांना जबर मारहाणही करण्यात आली होती. या घटनेनंतर पोलिसांनी टोळीची सखोल चौकशी केली असता विविध पोलीस ठाण्यांत त्यांच्या विरोधात अनेक गंभीर गुन्हे दाखल असल्याचे उघड झाले. मलकापूर शहर व परिसरात या टोळीची प्रचंड दहशत असल्याचेही निष्पन्न झाले.

या पार्श्वभूमीवर जिल्हा पोलीस अधीक्षक निलेश तांबे यांनी मकोका अंतर्गत कारवाईचा प्रस्ताव विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती यांच्याकडे पाठवला होता. सदर प्रस्तावास नुकतीच मंजुरी मिळाल्याने मलकापूर शहरातील या ९ जणांच्या संघटित गुन्हेगारी टोळीवर मकोकानुसार कारवाई करण्यात आली आहे. या निर्णायक कारवाईमुळे शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्यास मदत होणार असून नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

## दोन एक्करवरील ऊस जळून खाक

▸विदर्भ केसरी।ढाणकी / प्रतिनीधी: मिलिंद चिकटे

उमरखेड ग्रामीण अंतर्गत येणाऱ्या चुरमुरा रोड स्थित सुभाष चिकने या शेतकऱ्याच्या शेतातील ऊसा ला ३३ के.व्ही. हाय हॉल्ट विद्युत तारांच्या स्पर्शा मुळे दिनांक ३० डिसेंबर रोजी दुपारी ऊसावर ठिणगी पडल्यामुळे ऊस जाळल्याची घटना घडली आहे.

एम.एस.ई.बी ढाणकी च्या चुकीमुळे शेतकऱ्याचा हाता तोंडाशी आलेला घास हिरावून गेल्यामुळे शेतकरी सुभाष चिकणे यांचे आर्थिक नुकसान झाले आहे. याबाबत त्यांनी यासंदर्भात लेखी तक्रार दिली आहे.



सदर शेतकऱ्याच्या शेतातुन ढाणकी एम. एस. ई. बी ची ३३ के. व्हीं. विद्युत तार जमिनीपासून अगदी १०-१२ फुटावरून जात आहे. नियमाप्रमाणे ३३ के.व्ही. तार उंचीवर असले पाहिजे. या घटने पुर्वी शेतमालक सुभाष चिकने यांनी वारंवार तक्रार देखील केली होती. परंतु या तक्रारीची दखल घेण्यात आली नसल्यामुळे ही वेळ आल्याची शेतकऱ्याचा आरोप आहे. भविष्यात या विद्युततारा मुळे घटना घडू नये यासाठी विद्युत महामंडळाने ताबडतोब उंची वाढवावी व झालेली आर्थिक नुकसान भरपाई द्यावी अन्यथा तीव्र आंदोलनाचा ईशारा शेतकरी सुभाष चिकने यांनी दिला आहे.

■ " एम.एस.ई.बी. ढाणकी च्या हलगर्जी पणामुळे शेतकऱ्याचा २ लाखा चा ऊस जळाला. याबाबत कायदेशीर करवाई करून त्या शेतकऱ्याला झालेला आर्थिक नुकसान मिळवून देणार "
-शाहरुख पठाण
राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष
उमरखेड

# 31 कोटींचा 'निकोटीन'चा साठा जप्त

### पुण्यात 'एफडीए'ची मोठी कारवाई:अवैध हुक्का माफियांचे धाबे दणाणले

▸विदर्भ केसरी।

अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी राज्यातील प्रतिबंधित वस्तूंच्या विरोधात कठोर पावले उचलण्याचे आदेश दिल्यानंतर विभागाने राज्यभर जोरदार मोहीम सुरू केली असून, याच धडक कारवाईअंतर्गत पुणे जिल्ह्यातील मावळमधील टाकवे येथील 'मे. सोएक्स इंडिया प्रा. ली.' या कंपनीवर छापा टाकून तब्बल 31 कोटी 67 लाख 21 हजार 987 रुपयांचा विक्रमी मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. प्रतिबंधित वस्तूंच्या उत्पादनावर बडगा उगारत प्रशासनाने कंपनीच्या संचालक आणि व्यवस्थापकाविरोधात



गुन्हा दाखल केला असून, मंत्र्यांच्या कडक भूमिकेमुळे आणि सातत्याने होणाऱ्या आढाव्यामुळे अन्न व औषध प्रशासन विभागाची ही कारवाई अधिक तीव्र झाली आहे.

अन्न सुरक्षा अधिकारी श्रीमती अस्मिता टोणपे यांनी दिलेल्या माहितीनुसार, ही कारवाई 2 जानेवारी 2026 रोजी करण्यात आली. यापूर्वी 1 डिसेंबर 2025 रोजी या कंपनीच्या उत्पादनांचे नमुने तपासणीसाठी घेण्यात आले होते. मुंबईतील अन्न विश्लेषकांच्या अहवालानुसार, या नमुन्यांमध्ये 'निकोटिन' पॉझिटिव्ह आढळले. हे उत्पादन मानवी आरोग्यास घातक असून महाराष्ट्र सरकारने 16 जुलै 2025 रोजी काढलेल्या प्रतिबंधात्मक आदेशाचे उल्लंघन करणारे असल्याचे स्पष्ट झाले.

एकूण किंमत 31 कोटी 67 लाख 21 987 रुपये (31.67 कोटी) रुपयांचे विविध फ्लेवर्सचे तयार हुक्का प्रॉडक्ट्स, कच्चे पदार्थ आणि फ्लेवर्सचा साठा जप्त करून कंपनीच्या दारांना सील ठोकले आहे. या प्रकरणी अनिल कुमार चौहान (असिस्टंट मॅनेजर), असिफ फाजलानी (संचालक), फैजल फाजलानी (संचालक), मे. सोएक्स इंडिया प्रा. ली. (कंपनी) या व्यक्तींविरुद्ध पोलिसांनी गुन्हा नोंदवला आहे. आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम 3(5), 123, 223, 274, 275 आणि अन्न सुरक्षा व मानदे कायदा 2006 च्या विविध कलमांनुसार (कलम 30, 26, 27, 59) गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# अखेर भटक्या श्वानांचे लसीकरण!

### शिबीर संपन्न : दैनिक विदर्भ केसरी इम्पॅक्ट!



भटक्या कुत्र्यांवरील अज्ञात रोगाच्या प्रादुर्भावामुळे नागरिक भयभीत ! : उपाययोजनांची मागणी

मोकाट श्वानांचा नागरिकांच्या जिवाला घोर

▸विदर्भ केसरी।राजकुमार चिंचोळकर

आरोग्य विभागाचे सर्वेक्षण सुरु

-गोपाल पोहरे संस्थापक अध्यक्ष आझाद फाउंडेशन

▸विदर्भ केसरी।
राजकुमार चिंचोळकर

बाळापूर : तालुक्यातील उरळ येथील भटक्या कुत्र्यांना लागन झालेल्या अज्ञात रोगाचा प्रादुर्भाव नागरिकांना भेडसावत असल्या बाबत दैनिक विदर्भ केसरी वृत्तपत्रात दिनांक दिनांक ३ जानेवारी रोजी सविस्तर वृत्त प्रकाशित झाले असता संमधीत विभागाकडून उरळ येथे दिनांक ४जानेवारी रोजी शिबीर आयोजित करण्यात येवून भटक्या कुत्र्यांना लसीकरण मोहीम राबविण्यात आली आहे.

तर सध्याच्या परिस्थितीत ग्रामीण भागात अनोळखी भटक्या कुत्र्यांचा सुळसुळाट मोठ्या प्रमाणात निदर्शनास येत असून शहरी भागातील भटके कुत्रे पकडून ग्रामीण भागात रात्रीच्या सुमारास सोडून दिल्या जात असल्याचे नागरिकांच्या कडून बोलल्या जात आहे. मोठ्या संख्येने असलेल्या भटक्या कुत्र्यांना मोठ्या प्रमाणात खाज खरुज तसेच जखमी अवस्थेत असलेल्या कुत्र्यांची संख्या अधिक प्रमाणात आहे. त्यामुळे नागरीक तसेच लहान शालेय विद्यार्थ्यांच्या अंगावर भटकी कुत्रे धावून येत असल्याने शालेय विद्यार्थ्यांना दुखापत झाल्याच्या घटना सुध्दा घडलेल्या आहेत. त्याचप्रमाणे मोठ्या प्रमाणात असलेल्या भटक्या कुत्र्यांना खाज खरुज तसेच अज्ञात रोगांची लागन असल्याने नागरिकांमध्ये मोठ्या प्रमाणात भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. तालुक्यातील उरळ येथील बहुतांश नागरिकांच्या शरीरावर खाज सुटत असल्याची माहिती समोर येत आहे. या बाबतीत आझाद फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष गोपाल पोहरे यांनी अलीकडेच जिल्हा पशुसंवर्धन विभाग तसेच जिल्हा आरोग्य अधिकारी यांचे कडे निवेदन सादर करण्यात येवून या गंभीर विषयाकडे लक्ष देण्याची मागणी करण्यात आली होती तर या संदर्भात आरोग्य विभागाचे कार्यकारी यांनी उरळ गावात सर्वेक्षण करून नागरिकांना खाज खरुज ची लक्षणे तसेच या बाबतीत बाधीत रुग्ण आहेत का याबाबत सर्वेक्षण करून माहिती गोळा केली होती . पशुवैद्यकीय दवाखाना उरळ येथील पशुधन विकास अधिकारी डॉ निवेदीता रणवीर यांनी उरळ सरपंच सचिव यांना पत्र देऊन उरळ गावात शिबीर आयोजित करण्यात येवून गावातील भटक्या तसेच पाळीव कुत्र्यांना लसीकरण मोहीम राबविण्यात येत असल्याचे कळविण्यात आले होते.

■ गावातील काही नागरिकांना खाज/खरूज व त्यासंबंधी लक्षणे आढळून आली सदर बाबी कुत्र्यांमुळेच पसरले असल्याचे नाकारता येत नाही, जिल्हाभरात ग्रामीण भागात अत्यंत विद्रुप कुत्रे आढळत आहेत अचानक कुत्र्यांची संख्या वाढत आहे त्यामुळे गावागावात मोठ्या प्रमाणात जिल्हा पातळीवरून यंत्रणा राबवून यावर नियंत्रण आणणे गरजेचे आहे त्या अनुषंगाने दिनांक ४ जानेवारी रोजी लसीकरण मोहीम राबविण्यात आली.
-गोपाल अंबादास पोहरे
अध्यक्ष आझाद फाउंडेशन अकोला

## टँकर-दुचाकीच्या भीषण अपघातात तीन ठार

▸विदर्भ केसरी।टेंभुर्णी : प्रतिनिधी

सोलापूर-पुणे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६५ वर वेणेगाव (टें) शिवारात केमिकल टँकर व दुचाकीच्या भीषण अपघातात एक पुरुष व दोन महिलांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना रविवार दि. ४ जानेवारी रोजी पहाटे साडेतीन वाजताच्या सुमारास घडली. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

टेंभुर्णी पोलिस ठाण्याच्या हद्दीत वेणेगावच्या शिवारात पुण्याकडून सोलापूरच्या दिशेने जाणारा केमिकल टँकर(क्र. टीएस ३० टी ३३६६) हा महामार्गावरून जात होता. सदर टँकर बरकतअली मौलाअली शेख (२५, रा. जळकोट, ता. तुळजापूर, जि. धाराशिव) हा चालवत होता. याचवेळी पंढरपूरकडून नंदुरबारकडे दुचाकीवरून प्रवास करणारे मीरा राज्य भील(३८), पायल मीरा भील(१५) व खारकी मीरा भील (वय २६, सर्व रा. कोटबंधनी, पो. रायपूर, ता. शहादे, जि. नंदुरबार) हे वेणेगाव ब्रिजखालून साईड पट्टीने वेणेगाव फाट्याकडे येत होते.

वेणेगाव फाट्याजवळ पुणे-सोलापूर महामार्ग क्रॉस करून पुण्याच्या दिशेने जाण्याचा प्रयत्न करत असताना केमिकल टँकर व होंडा शाईन दुचाकी (क्र. एमएच ३९ ई ६७७८) यांची जोरदार धडक झाली. अपघात इतका भीषण होता की दुचाकीवरील तिघेही जण गंभीर जखमी झाले. अपघातानंतर जखमींना तातडीने खासगी ॲम्ब्युलन्सद्वारे टेंभुर्णी येथील मार्स मल्टी स्पेशालिस्ट हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. मात्र उपचारापूर्वीच तिघांचाही मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. या घटनेची माहिती मिळताच टेंभुर्णी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला असून पुढील तपास सुरू आहे.

दैनिक
# विदर्भ केसरी
विदर्भाचा मानबिंदू

सोमवार, ५ जानेवारी २०२६ 

अग्रलेख

# बंडोबांचे आव्हान !

महानगरपालिकांच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मंगळवार (३० डिसेंबर) ही अंतिम तारीख असून सर्वच राजकीय पक्षांनी बंडखोरी टाळण्यासाठी लपवाछपवीचा मार्ग स्वीकारला आहे. कारण त्यांच्यासमोर बंडोबांचे आव्हान कायम आहे. विशेष म्हणजे ही बंडखोरी सर्वपक्षीय आहे. मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीतही तेच चित्र आहे. सोमवारी उमेदवारांची यादी जाहीर होऊ लागल्यानंतर सर्वच राजकीय पक्षांत बंडखोरी उफाळून आली. त्यामुळे बंडखोरांची नाराजी दूर करण्याचे मोठे आव्हान राजकीय पक्षांसमोर उभे आहे. मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी सोमवारी दुपारनंतर काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (श. प.), ठाकरे सेना व मनसे यांनी आपले काही उमेदवार जाहीर केले. मात्र यात काही निष्ठावंत कार्यकर्त्यांना डावलले गेल्याने सर्वच राजकीय पक्षांतील इच्छुकांनी नाराजीचा सूर आळवला. राष्ट्रवादी काँग्रेसचे (श. प.) मुंबईतील जे मोजके माजी नगरसेवक होते, त्यातील मुंबई अध्यक्ष राखी जाधव, बबन कनावजे, धनंजय पिसाळ, मनीषा रहाटे या चारही माजी नगरसेवकांनी पक्षाला सोडचिठ्ठी देऊन दुस-या पक्षात प्रवेश केला. राखी जाधव यांनी भाजपचे कमळ हाती घेतले आहे. राखी जाधव यांनी भाजपात प्रवेश केल्याने भाजपची घाटकोपरमध्ये ताकद वाढली आहे. राखी जाधव २०१२ व २०१७ च्या निवडणुकीत प्रभाग क्रमांक १३१ मधून निवडून आल्या होत्या. मनसे नेत्या स्नेहल जाधव, भाजप नेत्या अर्चना पाटील यांनी ठाकरे सेनेत प्रवेश केला. ठाकरे सेनेचे चंद्रकांत वायंगणकर यांना उमेदवारी न मिळाल्याने त्यांचे कार्यकर्ते नाराज झाले आहेत. ठाकरे गटात प्रभाग क्र. ९५ च्या उमेदवारीवरून आमदार अनिल परब आणि वरुण सरदेसाई यांच्यात जोरदार खडाजंगी झाली. परब माजी नगरसेवक चंद्रकांत वायंगणकर यांच्यासाठी आग्रही होते, तर सरदेसाई यांनी दिवंगत नेते श्रीकांत सरमळकर यांच्या जावयासाठी अर्ज मागितल्याने परब संतप्त झाले. अखेर परब यांनी माघार घेतल्याने शास्त्री यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाले. मात्र, या वेळी परब आणि सरनाईक यांच्यातील अंतर्गत मतभेद समोर आले. मुंबई महानगरपालिकेवर भगवा झेंडा फडकवण्यासाठी उमेदवारी जाहीर करताना भाजपने सावध भूमिका घेतली आहे. सोमवारी भाजपने ६६ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली. मुंबई महापालिका निवडणुकीसाठी सुरुवातीला २२७ पैकी दीडशेहून अधिक जागा लढण्याची भाजपची तयारी होती. त्यामुळे एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेची कोंडी झाली होती. शिवसेनेने याबाबत नाराजी व्यक्त केल्यानंतर दोन्ही पक्षांत ८-१० दिवसांपासून बैठकांचे सत्र सुरू होते. अखेर भाजप आणि शिवसेनेत २०७ जागांवर एकमत झाले. भाजपच्या पहिल्या यादीत ठाकरेंच्या शिवसेनेला 'जय महाराष्ट्र' करत नुकताच भाजपात प्रवेश केलेल्या तेजस्वी घोसाळकर यांना प्रभाग क्र. १ मधून उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. तसेच भाजपचे माजी खासदार किरीट सोमय्या यांचे पुत्र नील सोमय्या यांना वॉर्ड क्र. १०७ मधून तिकिट देण्यात आले आहे. २०७ जागांपैकी १२८ जागा भाजप लढवणार आहे, तर शिवसेनेच्या वाट्याला ७९ जागा आल्या आहेत. अजून २० जागांवर दोन्ही पक्षांमध्ये तोडगा निघालेला नाही. मुख्यमंत्री फडणवीस यांचे निकटवर्तीय आणि भाजपचे माध्यम प्रमुख नवनाथ बन यांना मानखुर्द शिवाजीनगरच्या प्रभाग क्र. १३५ मधून उमेदवारी देण्यात आली आहे. युवा मोर्चा अध्यक्ष तेजिंदरसिंग यांना मुंबईतील वॉर्ड क्र. ४७ मधून उमेदवारी देण्यात आली आहे. मुंबई महापालिका निवडणुकीसाठी ठाकरे सेनेने सोमवारी सायंकाळपर्यंत अधिकृत उमेदवारांची यादी जाहीर न करताच निश्चित १२५ उमेदवारांना एबी फॉर्मचे वाटप केले. उमेदवार पळवापळवी टाळण्यासाठी ठाकरे सेनेने महायुतीला चकवा देत एबी फॉर्मचे गुपचूप वाटप केले. ठाकरे सेना १५० जागा लढवणार आहे म्हणे. मनसे ७० जागा लढवणार आहे. मुंबई महापालिकेसाठी काँग्रेसने सोमवारी ८७ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली. या यादीत खासदार चंद्रकांत हंडोरे यांची कन्या प्रज्योती हंडोरे यांना प्रभाग क्र. १४० मधून उमेदवारी देण्यात आली आहे. तसेच आमदार अस्लम शेख यांच्या मुलाला आणि बहिणीला उमेदवारी देण्यात आली आहे. नाशिक व छत्रपती संभाजीनगर महापालिका निवडणुकीत महायुतीत बिघाडी झाली असून महायुतीतील घटकपक्ष आपल्या सोयीनुसार युती करून निवडणुका लढवणार असल्याचे चित्र आहे. संभाजीनगरमध्ये भाजपसोबत युती करण्याच्या प्रयत्नांना प्रतिसाद मिळत नसल्याने शिवसेना शिंदे गटात अस्वस्थता आहे. पालकमंत्री संजय शिरसाट म्हणाले, भाजप सकारात्मक प्रतिसाद देत नसेल तर एकनाथ शिंदे युतीसाठी पर्यायी मार्ग काढतील. शिवसेनेने ४१ जागांचा प्रस्ताव दिला होता. सुमारे ८-९ बैठका झाल्या तरी त्यातून ठोस मार्ग निघाला नाही. नाशिक महानगरपालिकेसाठी महायुतीचा जागावाटपाचा तिढा न सुटल्याने महायुतीत फूट पडली असून शिंदे आणि अजित पवार गट एकत्र लढणार असल्याचे राष्ट्रवादी अजित पवार गटाचे नेते नरहरी झिरवळ यांनी जाहीर केले. भाजपने घेतलेल्या निर्णयामुळे आम्हाला स्वतंत्र विचार करावा लागत आहे, असे ते म्हणाले. पुण्यात दोन राष्ट्रवादी एकत्रितरीत्या लढणार आहेत तर भाजप व शिवसेना शिंदे गटाची युती होण्याची शक्यता आहे. पुण्याच्या राजकारणात पक्षांतराचा जोरदार सामना सुरू आहे. काही दिवसांपूर्वी भाजपने राष्ट्रवादी काँग्रेसला दिलेल्या धक्क्याची परतफेड अजित पवारांनी केली आहे. भाजपच्या काही माजी नगरसेवकांना आणि पदाधिका-यांना त्यांनी सोमवारी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये जाहीर प्रवेश दिला. भाजपचे माजी नगरसेवक शंकर पवार, किरण बारटक्के, धनंजय जाधव यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. ठाकरे गटाचे माजी नगरसेवक अशोक हरणावळ, भाजपचे संदीप ज-हाड, सुनीता गलांडे यांनीही हातात घड्याळ बांधले. भाजपने बंडखोरीची शक्यता लक्षात घेऊन सोमवारी यादी जाहीर न करता उमेदवारांना एबी फॉर्मचे वाटप केले. पक्षाने अशा प्रकारे थेट फॉर्म दिल्याने इच्छुकांचा चांगलाच गोंधळ उडाला. पत्ता कट झालेल्या माजी नगरसेवकांनी पक्षाच्या नेत्यांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राजकीय पक्षांनी जागावाटप व उमेदवार जाहीर करण्यास जाणीवपूर्वक उशीर केल्याचे दिसते. बंडखोरी टाळण्यासाठी हा युक्तिवाद केल्याचे सांगण्यात येत असले तरी त्यामागची कारणे अधिक खोलवर आहेत. एकाच जागेसाठी अनेक इच्छुक, ऐनवेळी आयात उमेदवारांना दिली जाणारी तिकिटे आणि वर्षानुवर्षे पक्षासाठी काम करणा-या निष्ठावंतांना डावलले जाणे यामुळे नाराजी वाढली. पूर्वीसारखी पक्षांतर्गत शिस्त आज कुठल्याच पक्षात दिसत नाही. कुंपणावर असलेले नेते संधिसाधूपणे पक्षांतर करून तिकिट मिळवतात आणि त्यासाठी विकास व समाजसेवेचे गोंडस लेबल लावले जाते. शेवटच्या क्षणापर्यंत इच्छुकांना 'कामाला लागा' असा संदेश देत प्रचार व खर्चाची जबाबदारी त्यांच्यावर टाकली जाते. निर्णय मात्र मोजक्यांच्या हातात राहतो. परिणामी बंडखोरी होते. नाराजी दडपली जाते, पण ती नष्ट होत नाही!

# बाळशास्त्री !आम्हाला माफ करा,प्लीज !

**सहा जानेवारी१८३२ ला बाळशास्त्री जांभेकर यांनी 'दर्पण' वृत्तपत्र सुरू केले होते.त्या दिवसाची आठवण म्हणून ६ जानेवारी हा दिवस महाराष्ट्रात "मराठी पत्रकार दिन" म्हणून साजरा केला जातो.त्या निमित्त्य .**

**न.मा.जोशी ८८०५८४८९५१**



■ (लेखक राज्यशास्त्राचे प्राध्यापक, राज्य मागास आयोगाचे माजी सदस्य आणि 'दर्पण' पुरस्कार प्राप्त पत्रकार आहेत)




सहा जानेवारीला मराठी पत्रकारितेचे जनक 'दर्पण'कार बाळशास्त्री जांभेकर यांची माध्यमांमध्ये गौरव गाथा गायिल्या जाईल.त्यात गोदी मीडिया देखील आघाडीवर असेल सहा जानेवारी१८३२ ला बाळशास्त्री जांभेकर यांनी 'दर्पण' वृत्तपत्र सुरू केले होते.त्या दिवसाची आठवण म्हणून सकाळी उठून 'दर्पण' पहात ६ जानेवारी हा दिवस महाराष्ट्रात "मराठी पत्रकार दिन" म्हणून साजरा केला जातो. कारण 'दर्पण' झुठ ना बोले! बाळशास्त्रींनी ब्रिटिश सरकारची चाटूकारिता न करता पत्रकारितेचा आदर्श निर्माण केला होता.न्याय, समता आणि व्यक्तिस्वातंत्र्य यासाठी त्यांनी असामान्य त्याग केला. योगायोग असा की नेमकी याच कालावधीत माध्यमांना आत्मपरीक्षण करावयास भाग पाडणारी एक बातमी वाचायला मिळाली.ब्रिटिश वृत्तसंस्था 'बीबीसी'चेमहानिदेशक, मुख्य वृत्त संपादक डेव्ही आणि कार्यकारी संपादक श्रीमती डेबोरा टर्नेस यांनी राजीनामा दिला आहे. डेबोरा टर्नेस सप्टेंबर २०२२ मध्येबीबीसी न्यूज आणि करंट अफेअर्सच्या सीईओबनल्या. त्या यापूर्वी आयटीएनच्या सीईओ होत्या,

जिथे त्यांनी संस्थेच्या तीन प्रमुख व्यावसायिक क्षेत्रांमध्ये - न्यूजरूम, दीर्घकालीन उत्पादन आणि व्यावसायिक/ब्रँडेड सामग्री - वाढीसाठी कोविडनंतरच्या धोरणाचे नेतृत्व केले. डेव्ही आणि श्रीमती डेबोरा यांच्या राजीनाम्याचे कारण काय तर एका कार्यक्रमात अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे भाषण संदर्भाबाहेर दाखवल्याचा त्यांच्यावर आरोप होता. व्हाईट हाऊसने 'बीबीसी'ला "प्रचार यंत्र" म्हटले होते. या एका चुकीसाठी चक्क माफी आणि राजीनामा!मात्र आपल्याकडे? या निमित्ताने माध्यमांमधील(सन्मानित अपवाद आहेत )स्वयंघोषित दिग्गज आणि पत्रकार जे स्वतःला सेलिब्रिटी मानतात त्यांनी आत्मपरीक्षण केले पाहिजे. कारण बातम्या प्रथम 'ब्रेक' करण्याच्या नादात अनेकदा तथ्य तपासणीशिवाय बातम्या देतात.जर त्या खोटया असल्याचे आढळले तर ना सुधारणा, ना नपश्चात्ताप, ना माफी ना खेद ना खंत. खूप वर्षांपूर्वी 'द इलस्ट्रेटेड वीकली ऑफ़ इंडिया' च्या एका अंकात घटनातज्ज्ञ नानी पालखीवाला यांनी पत्रकारितेच्या संदर्भात'हू विल वॉच द वॉचमन'? अर्थात 'पहारे क-याचा पहारा कुणी करावा' ? असा प्रश्न केला होता.

पहारेकरीच झोपले असतील तर त्यांचा पहारा कुणी करावा हा असा मूलभूत प्रश्न आजही गोदी मीडियाच्या काळात कायम आहे.अलिकडे काही सन्माननीय अपवाद वगळता सरकारची री ओढणाऱ्या गोदी मीडियाचा सुळसुळाट झाला आहे. पत्रकारितेतून वैयक्तिक लाभ पदरात पाडून घेण्याचा मोठा इतिहास आहे. भाजप सरकारने इंडियन एक्सप्रेसचे ए. सूर्यप्रकाश यांना प्रसार भारतीचे प्रमुख म्हणून नियुक्त केले आणि त्यांना पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित केले.राष्ट्रीय स्वयंसेवक संघात उघडपणे सामील झाल्यानंतर पत्रकार राकेश सिन्हा यांना राज्यसभेची जागाही मिळाली. बलबीर पुंज, चंदन मित्रा सारखे पत्रकारिता जगतात असे अनेक प्रमुख व्यक्ती आहेत ज्यांनी पत्रकारिता करताना भाजपच्या राजकारणातही महत्त्वाची भूमिका बजावली.अटलबिहारी वाजपेयी यांच्या सरकारच्या काळातस्वपन दासगुप्ता, विद्यानिवास मिश्रा राज्यसभेवर निवडून आले. पत्रकार रजत शर्मा यांना तर भाजप सरकारने पद्मश्री देऊन टाकली. रजत शर्मा म्हणजे होय बा पत्रकारितेचे 'हुजूरे गिरी'चे उत्तम उदाहरण असे त्यांचे शिष्य पत्रकार अभिसार शर्मा यांनीच म्हटले आहे. मोबाशिर जावेद अकबर अर्थात एम जे अकबर काँग्रेसतर्फे लोकसभेत गेले त्यानंतर ते भारतीय जनता पक्षात सामील झाले. ते राज्यसभेत गेले आणि त्यांना परराष्ट्र राज्यमंत्री म्हणून नियुक्ती मिळाली. अरुण शौरी! त्यांनी राजीव गांधीं आणि मुख्यमंत्री एआर अंतुले विरुद्ध इंडियन एक्सप्रेसचा वापर केला. अटलबिहारी वाजपेयी यांनी त्यांना मंत्री केले.नवभारत टाईम्सचे दीनानाथ मिश्रा,

त्यावेळी दररोज भाजप कार्यालयात आणि लालकृष्ण अडवाणी यांच्या घरी जात असत. भाजपने त्यांना राज्यसभेत पाठवले. हरिवंश नारायण सिंह. ते धर्मयुगात काम करत होते. चंद्रशेखर पंतप्रधान झाले तेव्हा ते त्यांचे अतिरिक्त माध्यम सल्लागार बनले. पत्रकार हरिवंश नारायण सिंह नितीश यांनी हरिवंश यांना राज्यसभेत पाठवले आणि आज ते राज्यसभेचे उपसभापती आहेत. काही काँग्रेसची सेवा करीत आहेत. . लोकसत्ताचे माजी संपादक कुमार केतकर काँग्रेस तर्फे राज्यसभा खासदार झाले. आमदार खासदार मंत्र्यांचे पीए असे बिरूद लावणारे पत्रकारही आहेत. त्यात गैर नाही.भुखे भजन न होई गोपाला. पत्रकारीता करताना पक्षनिष्ठा सांभाळत राजकीय लाभ पदरात पाडून घेणाऱ्यांची यादी मोठी आहे. हे असे करणे योग्य की अयोग्य याबद्दल दुमत आहे. ज्येष्ठ पत्रकार पंकज शर्मा काँग्रेसचे प्रवक्ते झाले तेव्हा त्यांच्यावर टीकेची झोड उठली. एका लेखातून त्यांनी आपल्या वेदनेला वाट मोकळी करून दिली आणि काही प्रश्न उपस्थितकेले. एक मात्र खरे की त्यामुळे निष्पक्ष पत्रकारिता आता इतिहास जमा झाली. आता माध्यमांच्या मालकांनाच खिशात घालण्याची सत्ताधिशांची आणि सत्ताधिशांच्या खिशात शिरण्याची मालकांची प्रवृत्ती पत्रकारितेच्या अधःपतनाला कारणीभूत ठरत आहे. एखादी व्यक्ती कितीही निर्भीड प्रामाणिक सत्यनिष्ठ आणि न्यायप्रिय असली तरी ज्या मालकांच्या हाताखाली तिला पत्रकारिता करावी लागते त्याची मर्जी खफा झाल्यास पत्रकार पत्रावळीकार होऊन जातो. राजीनामा देऊन स्वतःचे वृत्तपत्र किंवा न्यूज चॅनल काढणे इतकी त्याची ऐपत नसते. काही जणांनी असे प्रयत्न केले त्यांची दशा आणि दिशा न सांगितलेलीच बरी. बातम्या चुकीच्या किंवा पक्षपाती असू नयेत ही पत्रकारितेची पहिली आणि शेवटची अट 'बीबीसी'ने सिद्ध केलीआहे. परंतु भारतीय माध्यमांसाठी हाच दावा करणे धाडसाचे ठरेल .?? पालखीवाला यांनी 'हू विल वॉच द वॉचमन'? असा प्रश्न केला होता.तो आजही कायम आहे. रिग्रेट एररः या पुस्तकाचे लेखक क्रेग सिल्वरमन यांनी म्हटले आहे की, कोणत्याही देशाच्या लोकशाहीचे यशापयश मोजण्याचे थर्मामीटर म्हणजे त्या देशातील वृत्तपत्रे किती प्रमाणात निर्भीड आणि स्वतंत्र आहेत, ती खऱ्या अर्थाने जनतेचा आवाज आहेत की सत्तेच्या पुढे लाचार होऊन चाटूगिरी करण्यात धन्यता मानतात? पत्रकारिता हा सत्य आणि निष्पक्षतेवर आधारित एक आदरणीय व्यवसाय आहे, तर चाटुकारी पत्रकारिता ही एक अनैतिक प्रथा आहे जी वैयक्तिक फायद्यासाठी सत्याशी तडजोड आणि सत्तेची जी-हुजूरी करत स्वाभिमानशून्य लाचारी पत्करते.या पत्रकारितेला नाव पडले आहे 'गोदी मीडिया'. जागतिक वृत्तपत्र स्वातंत्र्य निर्देशांकात भारत १८० देशात १५८व्या क्रमांकावर आहे हे लक्षात घेतले पाहिजे., माध्यमांची भूमिका एका 'वॉचडॉग'ची असते. दुर्दैवाने, , हे 'वॉचडॉग' बहुतेकदा सत्ताधारी पक्षाचे प्रचारक बनताना दिसतात. महात्मा गांधी म्हणाले होते की, प्रेसचे काम सरकारच्या चुकांबद्दल जनतेला जागरूक करणे आहे, त्यांचे मुखपत्र बनणे नाही. जेव्हा एखादा पत्रकार किंवा अँकर त्यांच्या व्यासपीठाचा वापर नेत्याची प्रतिमानिर्मिती किंवा प्रतिस्पर्ध्याची प्रतिमाभंजन करण्यासाठी करतात तेव्हा ते पत्रकार नव्हे तर जनसंपर्क दलाल बनतात. लोकशाहीमध्ये, पत्रकार हा सत्तेचे संतुलन राखणारा चौथा स्तंभ आहे. पत्रकारितेत "निष्पक्षता" म्हणजे प्रत्येकाच्या विचारांना समान वागणूक देणे नव्हे, तर सत्याशी निष्ठा राखणे. लोकशाही तेव्हाच सुरक्षित राहील जेव्हा पत्रकार त्यांच्या व्यवसायाची भावना जिवंत ठेवतील. जेव्हा ते सत्तेला न घाबरता आपल्या 'वॉचमन' च्या भूमिकेला न्याय देतील.सत्तेवर लक्ष ठेवतील अन्यायावर प्रश्न विचारतील आणि लोकांच्या हक्कांचे रक्षण करतील. . माध्यम जगताशी संबंधित सर्व घटकांना, वार्ताहर, संपादक, पत्रकार ,मालक, विक्रेते जाहिरातदार आणि सहनशील वाचक या सर्वांना पत्रकार दिनाच्या आगाऊ शुभेच्छा!

**पैसे मे बिक गई कलम भी**
**कम्बख्त**
**उसे भी किसी के दर्द पर**
**रहम नहीं आया !**
**बेखौफ लिख दिया बेकसूर की**
**जिंदगी मे**
**'सजा- ए -मौत'**
**उसे भी बेगुनाही का सबूत**
**कहीं नजर नही आया.**

# मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत जिल्हा परिषद शाळेत विविध स्पर्धांचे बक्षीस वितरण

**▸विदर्भ केसरी। परतवाडा**




(ता. अचलपूर) — मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाच्या माध्यमातून ग्रामपंचायत देवगाव यांच्या पुढाकाराने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, देवगाव येथे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध शैक्षणिक व सर्जनशील स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या अंतर्गत रांगोळी स्पर्धा व निबंध स्पर्धा यशस्वीरीत्या पार पडल्या. या स्पर्धांतील गुणवंत विद्यार्थ्यांना आज दिनांक ३ जानेवारी २०२५ रोजी थोर समाजसुधारक व ज्ञानज्योती क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त बक्षीस वितरण करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. सावित्रीबाई फुले यांनी स्त्री शिक्षणासाठी केलेले कार्य, समाजातील अज्ञान व विषमता दूर करण्यासाठी दिलेला लढा आणि शिक्षणाच्या माध्यमातून समाज परिवर्तनाची त्यांनी दाखवलेली दिशा याविषयी उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांच्या विचारांचा आदर्श विद्यार्थ्यांनी आत्मसात करावा, यासाठीच अशा उपक्रमांचे आयोजन करण्यात येत असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले. मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत ग्रामपंचायत देवगाव सातत्याने नाविन्यपूर्ण व लोकाभिमुख उपक्रम राबवत आहे.

शालेय विद्यार्थ्यांमधील कला, लेखन व सर्जनशीलता विकसित व्हावी, तसेच त्यांच्यात सामाजिक जाणीव निर्माण व्हावी या उद्देशाने रांगोळी व निबंध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. रांगोळी स्पर्धेत विद्यार्थ्यांनी स्वच्छता, पर्यावरण संरक्षण, शिक्षणाचे महत्त्व, स्त्री सक्षमीकरण व आदर्श गाव संकल्पना या विषयांवर आकर्षक रांगोळ्या साकारून उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. निबंध स्पर्धेत विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फुले यांचे कार्य, शिक्षणाचे महत्त्व व सामाजिक मूल्ये या विषयांवर अभ्यासपूर्ण मांडणी केली. या बक्षीस वितरण कार्यक्रमास ग्रामपंचायत देवगावच्या माननीय सरपंच व आशाताई गजानन येवले, माननीय उपसरपंच श्री. गोविंदा गोंडूजी पाटील, तसेच ग्रामपंचायत अधिकारी कु. रागिनी प्रल्हादराव भोरे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. याशिवाय जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक श्री. रवींद्र श्रीखंडे, शाळेतील सर्व शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते रांगोळी व निबंध स्पर्धांमधील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे व बक्षिसे प्रदान करण्यात आली. यावेळी बोलताना माननीय सरपंच व आशाताई गजानन येवले यांनी ग्रामपंचायत देवगाव शिक्षणाला विशेष प्राधान्य देत असल्याचे सांगितले. मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा शैक्षणिक, बौद्धिक व सांस्कृतिक विकास साधण्याचा ग्रामपंचायतीचा प्रयत्न असल्याचे त्यांनी नमूद केले. उपसरपंच श्री. गोविंदा गोंडूजी पाटील यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून स्पर्धांमधील सहभागामुळे आत्मविश्वास व गुणविकास साधला जातो, असे मत व्यक्त केले. ग्रामपंचायत अधिकारी कु. रागिनी प्रल्हादराव भोरे यांनी ग्रामपंचायत व शाळा यांच्या समन्वयातून राबविण्यात येणारे उपक्रम आदर्श ठरत असल्याचे सांगून भविष्यातही अशा उपक्रमांना पाठबळ देण्यात येईल, असे आश्वासन दिले. मुख्याध्यापक श्री. रवींद्र श्रीखंडे यांनी ग्रामपंचायतीच्या सहकार्याबद्दल आभार मानून विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धात्मक वृत्तीबरोबरच सामाजिक भान निर्माण होण्यासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन शिक्षकवृंदाने केले. सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेले हे बक्षीस वितरण विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरले असून, ग्रामपंचायत देवगावच्या शैक्षणिक विकासाच्या दिशेने उचललेले हे पाऊल निश्चितच कौतुकास्पद असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.



# भाजपा नेत्याकडून विजय वडेट्टीवारांविरोधात पोलिस तक्रार

**▸विदर्भ केसरी। वाशिम,**

वाशिममध्ये काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांच्या विरोधात पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली आहे. भाजपाचे नेते आणि वाशिम जिल्हा निवडणूक प्रमुख राजू पाटील राजे यांनी ही तक्रार वाशिम पोलीस ठाण्यात नोंदवली आहे.

नागपूर येथे झालेल्या पत्रकार परिषदेत विजय वडेट्टीवार यांनी राजू पाटील राजे यांच्यावर बनावट नोटांच्या प्रकरणात गुन्हा दाखल असल्याचा दावा केला होता. मात्र, पोलिसांकडून करण्यात आलेल्या चौकशीत असा कोणताही गुन्हा राजू पाटील राजे यांच्या विरोधात नोंदलेला नसल्याचे स्पष्ट झाले आहे. हे आरोप खोटे, दिशाभूल करणारे आणि प्रतिमेला धक्का देणारे असल्याचे सांगत भाजप नेत्यांनी वडेट्टीवार यांच्या विरोधात तक्रार दाखल केली. वाशिम पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी संजय चौधरी यांनी सांगितले की, राजू पाटील राजे आणि त्यांच्या समर्थकांकडून तक्रार प्राप्त झाली असून, त्या अनुषंगाने सखोल चौकशी करून पुढील कायदेशीर कारवाई केली जाईल. तसेच वाशिम पोलीस ठाण्यात राजू पाटील राजे यांच्याविरोधात बनावट नोटांबाबत कोणतीही तक्रार किंवा गुन्हा नोंदलेला नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, भाजपा नेते राजू पाटील राजे यांनी विजय वडेट्टीवार यांनी जाणीवपूर्वक आपली बदनामी केल्याचा आरोप करत, त्यांच्या विरोधात १०० कोटी रुपयांचा मानहानीचा दावा दाखल करण्याचा इशारा दिला आहे.

# लोकशाही संपली आणि झुंडशाही सुरू झाली

## उद्धव ठाकरे : 'शब्द ठाकरेंचा' हा वचननामा प्रकाशित

**▸विदर्भ केसरी। मुंबई :**



महापालिकेसह २९ महापालिकांची निवडणूक १५ जानेवारीला पार पडणार आहे. तर १६ जानेवारीला निकाल लागणार आहेत. दरम्यान राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्या हस्ते मनसे, शिवसेना उद्धव ठाकरे पक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या संयुक्त वचननाम्याचे मुंबईत प्रकाशन करण्यात आले. यानंतर राज ठाकरेंनी निवेदन दिले.

''इथे आलेल्या सगळ्यांचं मी स्वागत करतो. मला २० वर्षांनी सुटून आल्यासारखं वाटत आहे. मी खूप वर्षांनी शिवसेना भवनात आलो. नवीन शिवसेना भवन मी पहिल्यांदाच पाहतो आहे. माझ्या मनातल्या आठवणी जुन्या शिवसेना भवनातल्या आहेत. त्यामुळे कुठे काय होतं हेच मला समजत नाही. जुन्या आठवणी आनंददायी आणि रोमांचकारी वगैरे होत्या. त्या आठवणींबाबत तुमच्यासह बसलो तर इतक्या गोष्टी सांगता येतील. पण मी त्या आठवणींमध्ये रमत नाही. आज शिवसेना, महाराष्ट्र नवनिर्माण सेना आणि राष्ट्रवादीचा जाहीरनामा प्रकाशित केला आहे. या वचननाम्यातल्या गोष्टी तुम्हाला आदित्य ठाकरे आणि अमित ठाकरेंनी सांगितल्या आहेत. असे राज ठाकरेंनी म्हटले आहे.

२०१७मध्ये मुंबई महापालिकेची निवडणूक पार पडली होती. त्यानंतर २०२२ ला शिवसेनेत फूट पडली. यानंतर शिवसेनेत दोन गट पडले. त्यानंतर ही पहिलीच निवडणूक आहे. या दोन्ही भावांच्या युतीचा वचननामा आता समोर आला आहे. राज ठाकरे हे शिवसेना भवनात पोहोचले. त्यानंतर उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांची चर्चा झाली. त्यानंतर हा वचननामा प्रकाशित करण्यात आला आहे. 'शब्द ठाकरेंचा' असे या वचननाम्याला नाव देण्यात आले आहे.

### उद्धव ठाकरेंनी काय म्हटले

**■ उद्धव ठाकरे म्हणाले, २० वर्षांनी राज इथे आला याचा आनंद आहे. नवचैतन्य संपूर्ण महाराष्ट्रात सळसळतं आहे. शिवशक्तीचा वचननामा आम्ही सादर करतो आहोत. शरद पवारांचा पक्ष आणि आम्ही आमचा हा संयुक्त वचननामा आहे असे यावेळी उद्धव ठाकरेंनी म्हटले आहे. जी झुंडशाही सुरू झाली आहे, लोकशाही संपली आहे असे उद्धव ठाकरे यावेळी म्हणाले.**

### राज ठाकरे २० वर्षांनी शिवसेना भवनात

**■ शिवसेना आणि मनसे यांचा वचननामा प्रकाशित झाला या निमित्ताने राज ठाकरे हे २० वर्षांनी शिवसेना भवनात आले. एक काळ होता की राज ठाकरेंचं या ठिकाणी कार्यालय होतं. त्यानंतर राज ठाकरे हे शिवसेनेपासून वेगळे झाले. आता शिवसेना उद्धव ठाकरे आणि मनसे या दोन पक्षांनी युती केली आहे. ज्यानंतर राज ठाकरे २० वर्षांनी शिवसेना भवनात पोहोचले आहेत. संजय राऊत म्हणाले, शिवसेना भवनात २० वर्षांनी राज ठाकरेंचं आगमन झालं आहे. महाराष्ट्रालाच बरं वाटतं आहे. असाच हा क्षण आहे असे संजय राऊत यांनी म्हटले आहे. राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकत्र येणं म्हणजे हिंदू वेगळे न होणं म्हणजे काय याचं उदाहरण आहे असेही संजय राऊत म्हणाले.**

दैनिक विदर्भ केसरी RNI MAHMAR/2022/88796 हे वृत्तपत्र प्रकाशक अमोल नरेश कंटाळे यांच्याव्दारे दैनिक विदर्भ केसरी कार्यालय शमीम आझाद शाळा दर्यापूर. जि. अमरावती कार्यालय, येथून मालक अमोल नरेश कंटाळे यांच्या वतीने प्रकाशित केलेले असून संपादक अमोल कंटाळे यांनी संपादीत केलेले आहे. आणि मुद्रक साई दर्पण प्रकाशन यांनी सिव्हिल लाइन दर्यापूर ता दर्यापूर जिल्हा अमरावती पिन 444803 येथे मुद्रीत केलेले आहे. (या वृत्तपत्रातील प्रकाशित झालेल्या जाहीरातीसंदर्भात त्या त्या कार्यालयाशी / संस्थेची व्यक्तीशः संपर्क साधुन खात्री करुन पुढील व्यवहार करावा. वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या लेख, वृत्त किंवा इतर मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (काही वाद निर्माण झाल्यास दर्यापूर न्यायालया अंतर्गत)

Printed by-Amol Naresh kantale (printer name) and published by- Amol Naresh kantale (Owner name) and printed at-SAI DARPAN PRAKASHAN civil line, Daryapur Tq-Daryapur dist, Amravati Maharashtra 444803 (name & complete address of printing press)and published at-shamim Azad school Rajputpura, Daryapur, dist, Amravati, Maharashtara-444803 complete place of publication-Editor-Amol Naresh Kantale(Editor name ) tital code. MAHMAR51049 l, Email:-vidarbhkesari21@gmail.com Mob-9975532291,9096945629

दैनिक
# विदर्भ केसरी
विदर्भाचा मानबिंदू


GOOD MORNING
## कॉटनसिटी
!! मन-मनात दारा-दारात फक्त विदर्भ केसरी!!

### भररस्त्यात अडवून तरुणाला लुटले

उमरखेड: शहरातील सत्यनारायण ऑईल मिलसमोर एका तरुणाला दगडाने मारहाण करून त्याच्याकडील रोख रक्कम पळवल्याची धक्कादायक घटना ३१ डिसेंबर रोजी घडली. फिर्यादी शेख अबुबकर शेख रहीम हे जात असताना आरोपी शेख फरीद शेख ख्वाजा याने त्यांना रस्त्यात अडवले. आरोपीने हातातील दगडाने फिर्यादीच्या डाव्या कानामागे, कोपर आणि बरगडीवर मारून गंभीर जखमी केले. मारहाण केल्यानंतर आरोपीने फिर्यादीची गचांडी धरून त्यांच्या खिशातील १०,००० रुपये जबरदस्तीने काढून घेतले. या जबरी चोरीप्रकरणी उमरखेड पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला असून तपास अधिकारी अधिक माहिती घेत आहेत.









# हजारो विद्यार्थ्यांनी सादर केल्या नेत्रदीपक कवायती

## विशुद्ध संस्थेत उत्तम पिढ्या घडताहेत - कुलसचिव अविनाश असनारे, ऑपरेशन सिंदूर देखाव्याने वेधले लक्ष

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ,**

**विशुद्ध विद्यालय द्वारा संचालित घटक संस्थांतील विद्यार्थ्यांच्या शारीरिक कवायती, राज्य व राष्ट्रीय पातळीवर पोचणाऱ्या खेळाडूंची संख्या आणि पालकांचा शिक्षकांवरील विश्वास पाहून इथे उत्तम पिढ्या घडत आहेत याची साक्ष पटते, असे प्रतिपादन संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी येथे केले.**

येथील शारीरिक प्रशिक्षण महाविद्यालय (बीपीएड) प्रांगणात विशुद्ध संस्थेअंतर्गत घटक संस्थांतील विद्यार्थ्यांच्या संयुक्त शारीरिक शिक्षण दिन शनिवारी संध्याकाळी उत्साहात संपन्न झाला, त्याप्रसंगी ते बोलत होते. विशुद्ध विद्यालय व वाणिज्य महाविद्यालय ट्रस्टचे अध्यक्ष विनायक दाते यांच्या अध्यक्षतेत झालेल्या या कार्यक्रमास डॉ. अविनाश असनारे यांच्यासह 47 महाराष्ट्र बटालियन एनसीसी यवतमाळचे कमांडिंग ऑफिसर कर्नल अनूप नायर प्रमुख पाहुणे उपस्थित होते. वाणिज्य महाविद्यालय ट्रस्टच्या उपाध्यक्ष सुषमा दाते, संस्थेचे सचिव विजय कासलीकर, कोषाध्यक्ष मंगेश केळकर, विशुद्धच्या सहसचिव मीरा केळकर यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झालेल्या या कार्यक्रमात विशुद्ध अंतर्गत केजी टू पीजी विविध शाळा-महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी संचलन सलामी दिली.

प्रारंभी उपस्थित पाहुण्यांना स्वागत प्रणाम देण्यात आला. अतिथींच्या हस्ते संस्थेच्या ध्वज फडकवल्यानंतर क्रीडा ज्योत प्रज्वलित करण्यात आली. पसायदान, वंदे मातरम् नंतर सर्व घटक संस्थांतील निवडक विद्यार्थ्यांनी लष्करी पद्धतीचे पथसंचलन केले. संस्थेचे सचिव विजय कासलीकर यांनी प्रास्ताविकात कार्यक्रमामागची भूमिका विशद केली. यावेळी राज्य व राष्ट्रीय स्तरावरील सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र तथा बक्षिसांचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन राणी लक्ष्मी विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रसाद कुलकर्णी व बाबाजी दाते कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या प्रा. स्नेहल सोनटक्के, विवेकानंद विद्यालयाच्या वैशाली ठाकरे व दाते डीएड् चे प्रा. राजेश चव्हाण यांनी तर प्रमाणपत्र वितरणाचे संचालन विवेकानंदचे मुख्याध्यापक विवेक अलोणी व राणी लक्ष्मीबाई चे पर्यवेक्षक देवेंद्र भिसे यांनी केले. प्राचार्य डॉ. राजेश सिंगरू यांनी आभारप्रदर्शन केले.


प्रमुख अतिथी कर्नल अनूप नायर यांनी याप्रसंगी बोलताना या संस्थेत येऊन आनंद झाला. विद्यार्थ्यांनी, विशेषतः एनसीसी कॅडेटस् यांनी अतिशय छान सादरीकरण केले. जगातील सर्वाधिक लोकसंख्येचा देश असणाऱ्या भारतातील ही पिढी नक्कीच आश्वासक आहे असे मत व्यक्त केले. अध्यक्षीय भाषणात विनायक दाते यांनी विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या आकर्षक शारीरिक कवायतींबद्दल त्यांचे व मार्गदर्शकांचे कौतुक केले. राष्ट्रगीताने या दिमाखदार सोहळ्याची सांगता झाली.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्राचार्य डॉ. अमोल देशमुख, प्राचार्य डॉ. श्रीकांत पर्बत, मुख्याध्यापक स्वाती जोशी, बळवंत सहस्त्रबुद्धे, किरण देशकर, अस्मिता पळसोकर व शारीरिक शिक्षक प्रफुल्ल गावंडे, मुकुंद हामंद, मन्साराम सावलकर, डॉ. रविजित गावंडे, प्रीतम सोनवणे व गोपाल चव्हाण यांच्या मार्गदर्शनात सर्व घटक संस्थांचे विद्यार्थी, प्राध्यापक, मुख्याध्यापक, पर्यवेक्षक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. यावेळी मुलांचे पालक व यवतमाळातील क्रीडा रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### पारंपारिक खेळ, बांबु ड्रिल

- **सामूहिक बैठी व खडी कवायत, राणी लक्ष्मीबाई विद्यालयातील विद्यार्थ्यांची जम्पिंग पीटी, योग ड्रिल व लाठीकाठी, रामगोपाल बाजोरिया विद्यालयातील विद्यार्थ्यांचे चंद्रभागेच्या तिरी, बाबाजी दाते कला आणि वाणिज्य महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे ऑपरेशन सिंदूर, आर्ट्स ऑफ योगा, पारंपरिक खेळ तसेच बांबू ड्रिल व मनोरे सादर झाले.**
- **विवेकानंद, रालवि व ध्रुव प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांचे मानवी मनोरे व रोप मल्लखांब लक्ष वेधून घेणारे होते. बाबाजी दाते इंग्लिश मीडियम शाळेतील मुलांचे प्रॉप ड्रिल व पारंपरिक खेळ, ध्रुव प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी सादर केलेले देशप्रेमी सैनिक, विवेकानंद विद्यालयातील विद्यार्थ्यांची क्लॅप ड्रिल, अ‍ॅक्शन साँग, लेझीम, व्यंकटेश विद्यालयातील विद्यार्थ्यांचे बंजारी नृत्य, बीपीएड कॉलेजचे रिदमिक ड्रिल आणि डीएड मधील विद्यार्थ्यांचे उलगुलान : एक यशस्वी लढा इत्यादी कार्यक्रमांनी पाहुण्यांच्या डोळ्यांचे पारणे फेडले.**

## संक्षिप्त...



### आश्रमशाळेच्या 42 विद्यार्थ्यांची रमण विज्ञान केंद्र, दीक्षाभूमीला भेट

**▸विदर्भ केसरी।**

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पुसद अंतर्गत शासकीय आदिवासी आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांसाठी नागपूर येथील रमण विज्ञान केंद्र, रेल्वे म्युझियम व दीक्षाभूमी येथे शैक्षणिक सहलीचे आयोजन करण्यात आले होते. गड-किल्ले, ऐतिहासिक वास्तू, संग्रहालये तसेच विज्ञान केंद्रांना भेट देणे हा शिक्षणाचा महत्त्वाचा भाग असून, याच उद्देशाने ही सहल राबवण्यात आली. या सहलीसाठी पुसद प्रकल्पातील सर्व शासकीय आदिवासी आश्रम शाळांमधून इयत्ता नववीच्या परीक्षेत प्रथम तीन क्रमांक मिळवलेले तीन मुले व तीन मुली अशा प्रत्येकी सहा विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. अशा प्रकारे एकूण ४२ विद्यार्थ्यांची या शैक्षणिक सहलीसाठी निवड झाली. दि. ३० डिसेंबर रोजी रमण विज्ञान केंद्र, नागपूर येथे जाण्यासाठी प्रकल्प अधिकारी अमोल मेतकर यांनी प्रवासी बसला हिरवी झेंडी दाखवून विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी सहाय्यक प्रकल्प अधिकारी कोट्रवार, शिक्षण विस्तार अधिकारी चटलेवाड तसेच मुख्याध्यापक रवी घड्याळे उपस्थित होते. सहलीदरम्यान विद्यार्थ्यांसोबत श्रीधर चांगोणे, समाधान जाधव व चिलमवार हे शिक्षक उपस्थित होते. प्रकल्प अधिकारी अमोल मेतकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शक सूचना देत सुरक्षित प्रवासासाठी शुभेच्छा दिल्या. या शैक्षणिक सहलीमुळे विज्ञान, इतिहास व संस्कृती विषयीचे ज्ञान वाढल्याची भावना विद्यार्थ्यांनी व्यक्त केली. सहलीदरम्यान मिळालेला अनुभव व ज्ञान शाळेतील इतर विद्यार्थ्यांनाही सांगणार असल्याची प्रतिक्रिया विद्यार्थ्यांनी दिली. रेल्वे म्युझियम, रमण केंद्राला भेट रमण विज्ञान केंद्रात विद्यार्थ्यांनी तारांगण कार्यक्रम, थ्री-डी शो तसेच एस.ओ.एस. कार्यक्रमाचा आनंद घेतला. यानंतर नागपूर येथील रेल्वे म्युझियमला भेट देऊन भारतीय रेल्वेच्या इतिहासाची माहिती जाणून घेतली. पुढे दीक्षाभूमीला भेट देत विद्यार्थ्यांनी सामाजिक व ऐतिहासिक महत्त्व समजून घेतले.

### बसस्थानकाबाहेर पार्किंगचा नियम कागदावरच

**▸विदर्भ केसरी।**

बसस्थानक परिसरात २०० मीटर आत अवैध प्रवासी वाहतूक करण्यास शासन परिपत्रकानुसार सरकारने निर्बंध आणले असताना सुद्धा उमरखेड बस स्थानकाचा गेटवरच अवैध प्रवासी वाहतूक होत असल्याने बसस्थानकाबाहेर २०० मीटर पार्किंगचा नियम हा कागदावरच आहे की काय हा संशोधनाचा विषय ठरत आहे. उमरखेड- यवतमाळ या मार्गे चालणाऱ्या ट्रॅव्हल्स मध्ये प्रवासी वाहतूक केली जाते. सदर ट्रॅव्हल्स हे नागपूर- तुळजापूर महामार्गावर बस स्टॉपचा गेटलगतच उभी करून प्रवासी भरले जातात. त्यामुळे अनेक वेळा वाहतुकीची कोंडी निर्माण होत वाहतुकीस अडथळा निर्माण होतो. अशाच वाहतुकीच्या अडथळ्यामुळे छोटे-मोठे अपघात सुद्धा होत आहेत. त्यातच सदर ट्रॅव्हल्स चालकांकडून बस स्थानकात उभे असणाऱ्या प्रवाशांना कमी तिकिटाचे आमिष दाखवून महामंडळातून प्रवासी पळवण्यात चे काम सदर ट्रॅव्हल्स चालक-वाहकाकडून होते. प्रवाशांची पळवा पळवी होत असल्याने महामंडळाला मोठे आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे

# महिला सुरक्षेसाठी दामिनी पथक सदैव तत्पर

## यवतमाळ जिल्हा पोलिसांचा पुढाकार,संकटात 112 हेल्पलाइनवर संपर्क साधण्याचे आवाहन

**▸विदर्भ केसरी।**



महिलांची सुरक्षा, सन्मान व संरक्षणासाठी यवतमाळ जिल्हा पोलिस दल सातत्याने कार्यरत असून या सुरक्षा उपक्रमाला अधिक बळकटी देण्यासाठी शुक्रवार, दि. २ जानेवारीला पोलिस मुख्यालय येथे ``दामिनी पथक``च्या नव्या वाहनाचे लोकार्पण करण्यात आले. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून आदिवासी विकास मंत्री अशोक उईके उपस्थित होते. नवनिर्वाचित नगराध्यक्ष अ‍ॅड. प्रियदर्शनी उईके यवतमाळ येथील महिला नगरसेविका यांनी श्रीफळ फोडून व वाहनाला हिरवे झेंडे दाखवून महिलांच्या सुरक्षेकरिता दामिनी पथक आधुनिक वाहनासह रवाना करण्यात आले.

या प्रसंगी जिल्हा जिल्हा पोलिस अधीक्षक कुमार चिंता यांनी सांगितले की, महिलांची सुरक्षा ही पोलिस दलाची सर्वोच्च जबाबदारी असून ``दामिनी पथका``मुळे महिलांना त्वरित मदत, जलद प्रतिसाद आणि प्रभावी कार्यवाही मिळणार आहे. महिलांच्या सुरक्षिततेसाठी पोलिस दल सदैव कटिबद्ध आहे. महिलांसोबत कोणत्याही प्रकारचा छळ, अत्याचार अथवा संशयास्पद घटना घडल्यास त्वरित ११२ हेल्पलाईन, पोलिस नियंत्रण कक्ष किंवा जवळच्या पोलिस ठाण्यात संपर्क साधावा, टवाळखोरी, छेडछाड, अश्लील हावभाव व सार्वजनिक ठिकाणी मुलींना त्रास देण्याच्या घटना अजिबात सहन केल्या जाणार नाहीत. अशा प्रकारची कृत्ये करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल. सर्व तरुणांनी जबाबदार नागरिक म्हणून वागावे, महिलांचा आदर राखावा असे आवाहन करण्यात आले.

या प्रसंगी यवतमाळ पोलिस अधीक्षक कुमार चिंता, यवतमाळ येथील महिला नगरसेविका व मान्यवर, पोलिस निरीक्षक महिला सुरक्षा कक्ष दिपमाला भेंडे, अवधुतवाडी ठाणेदार नंदकिशोर काळे, शहर ठाणेदार रामकृष्ण जाधव, लोहारा ठाणेदार रोहित चौधरी, आरपीआय चकाटे, एमटीओ ढवळे, पोलिस विभागाचे अधिकारी तसेच पोलीस कर्मचारी उपस्थित होते.

### ४४४८ विद्यार्थ्यांना प्रशिक्षण

- **सात निवासी शिबिरात प्रशिक्षण आतापर्यंत यवतमाळमधील एकुण १२ शाळा व महाविद्यालयातील एकुण ४ हजार ४४८ विद्यार्थ्यांना यशस्वीरीत्या प्रशिक्षण देण्यात आले आहे. यवतमाळ जिल्हा पोलिस दलातर्फे ऑपरेशन प्रस्थान या उपक्रमाअंतर्गत पहिल्या टप्प्यामध्ये एकुण सात निवासी शिबिरामध्ये १ हजार ८०० मुलींना व दुस-या टप्प्यामध्ये यवतमाळमधील एकुण १२ शाळा व महाविद्यालयातील एकुण ४ हजार ४४८ विद्यार्थी आतापर्यंत असे एकुण ६ हजार २४८ विद्यार्थ्यांना मोफत कराटे प्रशिक्षण देण्यात आले.**

# घरातच अवैधरित्या गुटख्याची साठवणूक



**▸विदर्भ केसरी। पुसद**

वसंतनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मधुकर नगर परिसरात महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधित असलेला गुटखा व सुगंधित पान मसाला साठवून ठेवण्यात आल्याची खात्रीशीर माहिती स्थानिक गुन्हे शाखा यवतमाळ व वसंतनगर पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे संयुक्त पथकाने तत्काळ हालचाली सुरू करत दिनांक २ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी सुमारे ७ वाजताच्या सुमारास धडक कारवाई केली. या कारवाईत शेख जाकीर शेख इस्माईल (वय ५२, रा. मधुकर नगर, पुसद) याला अटक करण्यात आली आहे.

वसंतनगर पोलिस व स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पंचांच्या उपस्थितीत आरोपीच्या घराची व पानटपरीची झडती घेतली. झडतीदरम्यान वेगवेगळ्या कंपनींचा महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधित असलेला गुटखा व सुगंधित पान मसाला मोठ्या प्रमाणात आढळून आला. सदर प्रतिबंधित साहित्य पोलिसांनी जप्त केले. प्राथमिक चौकशीत आरोपी हा अवैधरित्या गुटखा विक्री करत असल्याचे निष्पन्न झाले आहे. या प्रकरणी आरोपीविरुद्ध संबंधित कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास वसंतनगर पोलीस करीत आहेत. परिसरात यापुढेही अशा प्रकारच्या अवैध व्यवसायांवर कठोर कारवाई सुरूच राहणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

**नगराध्यक्ष अ‍ॅड. प्रियदर्शनी उईके ; जिल्हयातील 300 महिलांनी घेतले कायद्यासह आरोग्याचे धडे**

# यवतमाळ शहराच्या विकासासाठी प्रयत्न करणार

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ -.**



यवतमाळ शहराच्या विकासासाठी प्रयत्न करणार असून वाढीव एक टक्का टॅक्स कमी करणार असल्याचे त्यांनी सांगितले. त्याचप्रमाणे महिलांच्या सुरक्षिततेसाठी दामिनी पथक कार्यान्वित करणार असून चांगले काम करण्याची संधी आपण मला दिली असून या संधीचे सोने करू असे प्रतिपादन, अ‍ॅड. प्रियदर्शनी उईके यांनी केले. त्या आयोजित कार्यक्रमात उद्घाटक म्हणून शनिवारी बोलत होत्या.

महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती जिल्हा शाखा यवतमाळ यांच्या वतीने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीचे औचित्य साधून क्रांतीज्योती सावित्रीच्या लेकीची उद्बोधन कार्यशाळा व सन्मान सोहळ्याचे आयोजन शनिवारी (ता.३) सहकार भवन यवतमाळ येथे करण्यात आले होते.या उद्बोधन कार्यशाळेचे उद्घाटन नवनिर्वाचित यवतमाळ नगराध्यक्ष अ‍ॅड. प्रियदर्शनी अशोकराव उईके यांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्राथमिक शिक्षक समितीचे राज्याध्यक्ष विजय कोंबे यांची उपस्थिती होती.तर प्रमुख अतिथी म्हणून उपशिक्षणाधिकारी डॉ. शिल्पा पोलपेल्लीवार , अधिव्याख्याता श्रीमती मधुमती सांगळे ,विस्तार अधिकारी प्रणिता गाढवे, प्रमुख मार्गदर्शक प्राचार्य डॉ. सुप्रभा यादगिरवार मानसोपचार तज्ञ डॉ. श्रीकांत मेश्राम ,प्रसिद्ध स्त्री रोग तज्ञ डॉ. हितेशा , राज्य प्रमुख भंडारी प्रफुल पुंडकर,ज्ञानेश्वर नाकाडे, जिल्हाध्यक्ष पुंडलिक रेकलवार,संजय काळे, गजानन देऊळकर ,संदीप मोहाडे, पतसंस्थेचे अध्यक्ष महेश सोनेकर ,महिला आघाडी प्रमुख सुनिता जतकर, प्रवीण बानोरकर, प्रशांत निंभोरकर ,आदींची उपस्थिती होती

### ७५ विविध क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणा-यांचा सत्कार

- **याप्रसंगी जिल्ह्यातील 300 महिलांनी कायद्यासह आरोग्याचे धडे घेतले .त्याचप्रमाणे जिल्ह्यातील 75 विविध क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या महिलांचा सत्कार उपस्थित मान्यवरांच्या हस्ते शाल व सन्मानचिन्ह देऊन करण्यात आला. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जिल्हाध्यक्ष पुंडलिक रेकलवार ,प्रफुल पुंडकर , आशन्ना गुंडावार, मुकेश भोयर सुनीता जतकर ,सुनिता बुटले,शालिनी शिरसाट ,विजय लांडे सुभाष पारधी, पुंडलिक बुटले, वनिता झुरळे, अर्चना भरकाडे, राजहंस मेंढे तथा जिल्ह्यातील शिक्षक समिती महिला आघाडीच्या सदस्यांनी पुढाकार घेतला .या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नीलिमा पाटील ,शुभदा येवले , कुमुद डाखोरे यांनी केले. तर उपस्थितांचे आभार शालिनी शिरसाट यांनी मानले. अशी माहिती राजहंस मेंढे यांनी दिली.**

### जुन्या वादातून शेत मजुरावर कुऱ्हाडीने हल्ला

**▸विदर्भ केसरी। दिग्रस:**

तालुक्यातील गांधी नगर परिसरात शेतातून काम करून परतणाऱ्या एका ५० वर्षीय मजुरावर जीवघेणा हल्ला झाल्याची घटना घडली आहे.


फिर्यादी बाबुसिंग रामचंद्र पवार हे २ जानेवारी रोजी सायंकाळी ७ च्या सुमारास शेतातून घरी परतत होते. यावेळी आरोपी गरदार चंदू पवार (वय ३०) याने 'तू शेताकडे का आला होतास?' असा जाब विचारत वाद घातला. रागाच्या भरात आरोपीने हातातील लोखंडी फावड्याने फिर्यादीच्या उजव्या कमरेवर प्रहार करून त्यांना जखमी केले. तसेच शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी दिग्रस पोलिसांनी कलम ११८(१), ३५२, ३५१(२) अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

दैनिक **विदर्भ केसरी** विदर्भाचा मानबिंदू

सोमवार, ५ जानेवारी २०२६ | २

GOOD MORNING
# अकोला+वाशिम
!! मना-मनात दारा-दारात फक्त विदर्भ केसरी!!

## परदेशी पाहुण्यांचे जिल्ह्यात ठाण



गोंदिया: गोंदिया जिल्हा हा गेल्या एक महिन्या पासून विदर्भात सर्वात थंड जिल्हा म्हणून नोंदविला जात आहे. जिल्ह्यात थंडी वाढताच देशी-विदेशी पक्ष्यांचे आगमन जिल्ह्यातील नवेगावबांध परिसरातील जलाशय आणि पाणथळ ठिकाणी होऊ लागते. सद्यःस्थितीत थंडी अधिक जाणवू लागली आहे. त्यामुळे विविध प्रकारचे देशी-विदेशी पक्षी पाहुणे परिसरात बागडताना दिसत आहेत. गत पंधरवड्यात हजारोंच्या संख्येने विविध प्रजातींचे पक्षी जिल्ह्यातील विविध भागांमध्ये दाखल झाले आहेत.

## संक्षिप्त...

### मॅरेथॉनमध्ये तृतीय क्रमांक पटकवल्यानंतर १५ वर्षीय विद्यार्थिनीचा मृत्यू

**विदर्भ केसरी। डहाणू :**

तलासरीच्या वेवजी येथील लोकभारती संस्थेच्या भारती अकादमी इंग्लिश स्कूलमध्ये क्रीडा महोत्सव सुरू होता. यामध्ये विविध स्पर्धांचा समावेश होता .मॅरेथॉन स्पर्धेदरम्यान दुःखद घटना घडली . मॅरेथॉनमध्ये धावणाऱ्या विद्यार्थिनीचा मृत्यू झाला. विद्यार्थिनीने मॅरेथॉनमध्ये तृतीय क्रमांक पटकावलेला . शर्यत पूर्ण केल्यानंतर आलेल्या हृदयविकाराच्या झटक्याने या मुलीचा जीव गेल्याचे समजते. विजयाचा आनंद साजरा करण्यापूर्वीच काळाने मुलीवर झडप घातली. शर्यत संपल्यानंतर तिला धाप लागत होती. श्वास घेण्यास त्रास होऊ लागल्याने ती मैदानात बसली आणि काही क्षणातच बेशुध्द पडली. शिक्षकांनी तिला तातडीने जवळच्या रुग्णालायत दाखल केले, मात्र उपचारापूर्वीच तिचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. या प्रकरणाची नोंद पोलिस ठाण्यात करण्यात आली. ताज्या घटनेमुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षतेचा प्रश्न निर्माण झाला आहे. पालकवर्गामध्ये चिंतेचे वातावरण आहे. कडक उन्हात होणारे क्रीडा स्पर्धांचे आयोजन आणि त्यामुळे होणार त्रास , पिण्याच्या पाण्याची गैरसोय आणि उपाशीपोटी स्पर्धत सहभागी होणे . यामुळे विद्यार्थी आजारी पडतात , त्यांना चक्कर येते किंवा बेशुध्द देखील पडतात. या घटनेमुळे केवळ औपचारिकतेसाठी स्पर्धांच आयोजन न करता शाळांनी विद्यार्थ्यांच्या आरोग्याची आणि सुरक्षतेची जबाबदारी घेतली पाहिजे; अशी मागणी जोर धरू लागली आहे.

### इच्छुक उमेदवाराचा पत्नीसह 'आत्महत्येचा इशारा'

**विदर्भ केसरी। नाशिक,**

आगामी महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर उमेदवारी मिळवण्यासाठी विविध पक्षांतील कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांकडून मोठ्या प्रमाणात गोंधळ घातला जात असल्याचे चित्र समोर आले आहे. छत्रपती संभाजीनगर आणि नाशिकमध्ये उमेदवारीवरून थेट नेत्यांना जाब विचारल्याचे दृश्य टीव्हीवर झळकले असून, काही ठिकाणी भावनिक वातावरण निर्माण झाले. उमेदवारी न मिळाल्याने अनेक कार्यकर्त्यांना अश्रू अनावर झाल्याचेही दिसून आले. विशेषतः नाशिकमध्ये भाजपची उमेदवारी मिळवण्यासाठी आपसात कुरघोडी सुरू असल्याचे स्पष्ट झाले आहे. नाशिकमध्ये भाजप आणि एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना स्वतंत्रपणे निवडणूक लढवत आहेत. सुरुवातीला युतीसाठी प्रयत्न झाले असले, तरी ते यशस्वी ठरले नाहीत. उलट नाशिकमध्ये शिंदे गटाची शिवसेना आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये युती झाली असून, भाजप या समीकरणाबाहेर राहिल्याचे चित्र आहे. दरम्यान, नाशिकमध्ये Shiva Telang एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत अंतर्गत वाद चिघळल्याचे पाहायला मिळत आहे. प्रभाग क्रमांक ३१ मधील इच्छुक उमेदवार शिवा तेलंग यांनी पत्नीसमवेत आत्महत्येचा इशारा दिल्याने खळबळ उडाली आहे. सोशल मीडियावर पोस्ट केलेल्या पत्रात त्यांनी आपल्या संभाव्य आत्महत्येस काही पक्षनेते जबाबदार राहतील, असा गंभीर आरोप केला आहे. तसेच, महानगरप्रमुख प्रवीण तिदमे यांनी उमेदवारी वाटपात पैशांची देवाणघेवाण झाल्याचा आरोप केला आहे. एका प्रभागात दोन जणांना एबी फॉर्म दिल्याने हा गोंधळ निर्माण झाल्याचे सांगितले जात आहे. संबंधित पत्र सोशल मीडियावर पोस्ट केल्यानंतर शिवा तेलंग संपर्कात नसल्याची माहिती आहे.या घडामोडींवर प्रतिक्रिया देताना मंत्री दादा भुसे यांनी परिस्थिती स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला. ते म्हणाले की, राजकारणात प्रत्येक इच्छुकाला उमेदवारी देणे शक्य नसते. एका जागेसाठी अनेक इच्छुक असतात आणि त्यातून एकाची निवड करावी लागते. काहींना दुर्दैवाने संधी देता आली नाही, मात्र सुमारे ९५ टक्के शिवसैनिकांनी निर्णय स्वीकारून कामाला सुरुवात केली आहे. युतीसाठी शेवटपर्यंत प्रयत्न झाले, पण ती शक्य न झाल्याचेही त्यांनी मान्य केले.निवडणुकीबाबत आशावाद व्यक्त करताना दादा भुसे म्हणाले की, मालेगाव महानगरपालिका निवडणुकीत शिवसेनेचे वीसपेक्षा अधिक उमेदवार विजयी होतील, तसेच नाशिक महापालिकेवर शिवसेनेचाच भगवा फडकवला जाईल. दरम्यान, उमेदवारीवरून सुरू असलेल्या वादांमुळे निवडणुकीपूर्व वातावरण अधिकच तापले असून, पुढील काही दिवसांत राजकीय घडामोडींना वेग येण्याची शक्यता आहे.

### प्रचारफेरी, सभा, मिरवणूक परवानगीसाठी एक खिडकी परवानगी कक्ष

**विदर्भ केसरी। पुणे :**

पुणे महापालिकेच्या निवडणुकीसाठी उभे असलेले उमेदवार प्रचारफेरी, सभा, मिरवणूक याद्वारे प्रचार करणार आहेत. त्यासाठी बोर्ड बॅनर, फ्लेक्स, प्रचार वाहने प्रचारफेरी, सभा आणि मिरवणुकीसाठी पालिकेकडून निवडणूक कक्षाची परवानगी घेणे आवश्यक आहे. या एक खिडकी परवानगी कक्षाचे उद्घाटन आयुक्त नवल किशोर राम यांच्या हस्ते झाले. या ऑनलाइन प्रणालीद्वारे प्रचारफेरी आणि सभा मिरवणूक, तसेच विविध परवानगी प्रमाणपत्र देण्याची यंत्रणा कार्यरत करण्यात आली आहे. यावेळी अतिरिक्त आयुक्त ओमप्रकाश दिवटे, उपायुक्त प्रसाद काटकर, रवी पवार, राहुल जगताप आदी उपस्थित होते. पुणे महापालिकेने प्रथमच ही ऑनलाइन यंत्रणा सुरू केली आहे. https://electionpermits.pmc.gov.in/ या ऑनलाइन प्रणालीद्वारे पालिकेच्या एकूण १५ क्षेत्रीय कार्यालयात जोडण्यात आले आहेत. उमेदवाराने मागणी केलेल्या परवानगीनुसार आवश्यक फी शुल्क भरणे आवश्यक आहे.

# मला माझे पप्पा आणून द्या

## अमित ठाकरेंसमोर चिमुकल्यांचा टाहो, मृत बाळासाहेब सरवदेंच्या कुटुंबीयांची आक्रोश

**विदर्भ केसरी।**



सोलापुरात महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उमेदवारी अर्ज मागे घेण्यावरून झालेल्या वादातून मनसेचे पदाधिकारी बाळासाहेब सरवदे यांची निर्घृण हत्या करण्यात आली आहे. बाळासाहेब सरवदे यांच्या पार्थिवावर काल शोकाकुल वातावरणात आणि कडेकोट पोलिस बंदोबस्तात अंत्यसंस्कार करण्यात आले. आज मनसे नेते अमित ठाकरे यांनी सोलापूरचा दौरा करत सरवदे कुटुंबीयांची सांत्वनपर भेट घेतली. यावेळी आपल्या आधारवड गमावल्यामुळे सरवदे कुटुंबाने केलेला आक्रोश अत्यंत हृदयद्रावक होता. या भेटीनंतर अमित ठाकरे यांनी स्थानिक प्रशासनाकडून घटनेची माहिती घेत या प्रकरणातील दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

बाळासाहेब सरवदे यांच्या कुटुंबीयांची भेट घेतल्यानंतर अमित ठाकरे यांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधत प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले, तुमचे राजकारण काहीही असो, तुमचे बिनविरोध निवडून येवो. पण राजकारणासाठी कोणाचा जीव जाता कामा नये. मी या संदर्भात मुख्यमंत्री, गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणार असल्याची माहिती अमित ठाकरे यांनी दिली. यावेळी, 'माझे पप्पा मला आणून द्या, माझ्या पप्पाला मी भेटलेच नाही, असा टाहो बाळासाहेब यांच्या चिमुकल्यांनी फोडला. तसेच सरवदे कुटुंबीयांनी देखील अमित ठाकरे यांच्यासमोर आक्रोश व्यक्त केला.

मृत बाळासाहेब सरवदे यांच्या पत्नी वंदना सरवदे यांनी यावेळी म्हटले की, येथील उमेदवार रेखा सरवदे यांना उमेदवारी अर्ज माघारी घेण्यासाठी दबाव टाकण्यात आला होता. त्यातूनच येथे वाद झाला. यापूर्वी आमचे कोणतेही भांडण नव्हते. किरण देशमुख यांच्या सांगण्यावरून हे सगळे घडले आहे. सर्व आरोपीवर मोक्का अंतर्गत कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

### भाजपचा खरा चेहरा सर्वांच्यासमोर आला- प्रणिती शिंदे

कॉंग्रेसच्या खासदार प्रणिती शिंदे यांनी या घटनेवर संतप्त प्रतिक्रिया दिली आहे. त्या म्हणाल्या, बाळासाहेब सरवदे यांच्या हत्येच्या निषेधार्थ आम्ही मूक आंदोलन केले आहे. सरवदे कुटुंबियांच्या पाठीमागे आम्ही सर्वजण आहोत. भाजपची सत्तेसाठी जी भूक आहे, जिंकण्यासाठी ते काहीही करू शकतात. भाजपचा खरा चेहरा सर्वांसमोर आला आहे. फक्त पैसा आणि सत्ताच नाही तर ते आता रक्तावर येऊन थांबले आहेत. तसेच लोकांच्या सेवेसाठी नाही तर लोकांचे जीव घेऊन त्यांना सत्तेत यायचे आहे. दोन कुटुंबामध्ये भांडण आणि एक निरागस माणसाचा जीव यांनी घेतला. निवडणूक जिंकण्यासाठी भाजप कुठल्याही थराला जाऊ शकते हे आज सिद्ध झाले. संविधान वाचवण्यासाठी आमची लढाई राक्षसी भाजप विरोधात सुरूच राहील, असे शिंदे म्हणाल्या.

# चंद्रपूरात नेत्यांमध्ये मतभेद असू शकतात, मनभेद नाहीत : मुख्यमंत्री फडणवीस




**विदर्भ केसरी। चंद्रपूर :**

चंद्रपूरातील भाजपमध्ये कोणतेही वाद नाहीत. एखाद्या मुद्द्यावर मतभेद होऊ शकतात, मात्र मनभेद नाहीत. सर्व नेते आणि कार्यकर्ते एकत्र आहेत, असा ठाम संदेश राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिला. महानगर पालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर विजय संकल्प यात्रेनंतर माध्यमांशी संवाद साधताना रविवारी (दि. ४ जानेवारी) त्यांनी चंद्रपूरातील राजकीय परिस्थितीवर स्पष्ट भूमिका मांडली.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, चंद्रपूरात सुधीर मुनगंटीवार हे आमचे ज्येष्ठ नेते आहेत, तर किशोर जोरगेवार हे आमदार आहेत. या ठिकाणी कुठेही वाद नाही. आज चंद्रपूरात जो विकास दिसतो आहे, त्यामध्ये मुनगंटीवार, माजी केंद्रीय मंत्री हंसराज अहिर आणि जोरगेवार यांचे मोठे योगदान आहे. त्यांच्या तसेच भाजपशिवाय दुसऱ्या कुणी या शहरात विकास केल्याचे दाखवू शकत नाही. त्यामुळे येणाऱ्या महानगर पालिका निवडणुकीत चंद्रपूरला प्रचंड मोठा विजय मिळणार आहे, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

निवडणूक प्रचाराबाबत बोलताना मुख्यमंत्री म्हणाले, कमी दिवसांत जास्तीत जास्त प्रचार करायचा आहे. सगळीकडे पोहोचण्याचे आव्हान आहे. कार्यकर्ते आणि नेत्यांच्या अपेक्षा मोठ्या आहेत. त्यामुळे वेगवेगळ्या माध्यमांतून थ्री-सिक्स्टी डिग्री प्रचार केला जात आहे. मुनगंटीवार यांना मंत्रीपद दिले नाही, यावर बोलताना मुख्यमंत्री म्हणाले, युतीच्या राजकारणात २० जागा बाहेर द्याव्या लागल्या. त्यामुळे काही नेते आणि कार्यकर्त्यांवर अन्याय झाला आहे. मात्र युतीचे राजकारण करताना कुणाला ना कुणाला त्याग करावाच लागतो. तरीही चंद्रपूरसह संपूर्ण महाराष्ट्रावर आमचे पूर्ण लक्ष आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

### पराभव स्पष्ट दिसत असल्याचे मनसे कारणे शोधताहेत

दरम्यान, ६६ उमेदवार बिनविरोध निवडून आल्याच्या मुद्द्यावर मनसे न्यायालयात जाणार असल्याच्या भूमिकेवर मुख्यमंत्र्यांनी टोला लगावला. "मनसेने खुशाल कोर्टात जावे. आम्हाला जनतेच्या कोर्टाने निवडून दिले आहे. जनतेच्या कोर्टाचा फैसला कायम राहील," असे ते म्हणाले. अविरोध निवडून आलेल्यांमध्ये भाजपसोबतच अपक्ष आणि इतर पक्षांचे उमेदवारही आहेत. मात्र त्यावर बोलले जात नाही. पराभव स्पष्ट दिसत असल्याने कारणे शोधली जात आहेत, असा टोलाही त्यांनी लगावला.

# शिक्षकांच्या शालेय कामकाजाचे बिघडले गणित



**विदर्भ केसरी। कुडूस :**

महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिक्षकांवर सोपविण्यात येणाऱ्या निवडणूक कामाच्या वर्गवारीबाबत प्रशासनाकडून वेळेत आणि स्पष्ट माहिती न मिळाल्याने पालघर जिल्ह्यातील शिक्षकांना मोठ्या प्रमाणावर मनस्ताप सहन करावा लागत आहे.अगोदर दिलेले आदेश वारंवार बदलण्यात आल्याने शिक्षकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले असून प्रशासनाच्या असमन्वयावर तीव्र नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.

निवडणूक प्रक्रियेसाठी शिक्षकांची नेमणूक करताना कोणत्या शिक्षकाला, कोणत्या स्वरूपाचे काम देण्यात येणार आहे, याबाबत ठोस व स्पष्ट निर्देश नसल्याने अनेक शिक्षकांना तहसील व महापालिका कार्यालयांच्या वारंवार फेऱ्या माराव्या लागत आहेत. काही शिक्षकांना अगोदर एका प्रकारचे काम देण्यात आले, नंतर त्यात बदल करून वेगळेच काम सोपविण्यात आले. या विचित्र आदेशांमुळे शिक्षकांची वैयक्तिक तसेच शालेय कामांची गणिते पूर्णपणे बिघडली आहेत.

शिक्षकांवर आधीच अध्यापनाचे मोठे ओझे आहे. शाळेतील अध्यापन, अभ्यासक्रम पूर्ण करण्यासह इतर अनेक जबाबदारी शिक्षक पार पाडत असतात. त्यातच निवडणूक कामामुळे शिक्षकांवर कामाचा प्रचंड ताण वाढला आहे. अतिरिक्त ताणाचा थेट परिणाम अध्यापनावर होत असून काही ठिकाणी विद्यार्थ्यांच्या शिकवणीकडे अपेक्षित लक्ष देता येत नसल्याची खंत शिक्षकांकडून व्यक्त केली जात आहे. शिक्षणाचा दर्जा खालावण्याची भीती व्यक्त होत असताना प्रशासनाकडून मात्र या गंभीर बाबीकडे दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप शिक्षक संघटनांनी केला आहे.

# रानगव्याच्या हल्ल्यात शेतकरी ठार



**विदर्भ केसरी। गोंदिया:**

गोरेगांव तालुक्यातील सोनेगाव येथे गावातून शेताकडे जात असताना जंगलातून आलेल्या रानगव्याने शेतकऱ्यावर हल्ला केला. त्यात शेतकऱ्याचा घटनास्थळीच मृत्यू झाला. ही घटना नवेगाव_नागझिरा व्याघ्र प्रकल्पालगत असलेल्या गोरेगांव तालुक्यातील सोनेगाव येथे रविवार ४ जानेवारी सकाळी ९:४५ वाजता दरम्यान घडली.

मृतक शेतकऱ्याचे नाव नीलकंठ नंदलाल तुरकर ( ५७) रा. सोनेगाव तालुका गोरेगाव जिल्हा गोंदिया असे आहे. नीलकंठ हा नेहमीप्रमाणे सकाळी घरातून शेताकडे जाण्यासाठी निघाला. गावातील चौकात मित्रमंडळी सोबत थोड्यावेळ गप्पा गोष्टी केल्यानंतर सोनेगाव ते शहारवाणी रस्त्यावर असलेल्या शेताकडे जाण्यासाठी निघाले. अचानक जंगलातून आलेल्या रानगव्याने त्यांच्यावर हल्ला चढवून पोटात शिंगे खुपसली. यात ते गंभीर जखमी झाले. त्यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. ही बातमी गावात पसरताच गावकऱ्यांनी तिकडे धाव घेत रानगव्याला पिटाळून लावले. मात्र त्यानंतर सदर रानगवा कवलेवाडा, चिचगावटोला परिसरात आल्याने या भागातील लोकांनी ही त्याला पिटाळून लावले. असे असले तरी या परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

# सासूने मित्राच्या मदतीने सुनेची केली हत्या



**विदर्भ केसरी।**

६० वर्षाच्या महिलेने ३५ वर्षीय सुनेची हत्या केल्याच्या घटनेने कल्याणमध्ये खळबळ उडाली आहे. सासूने सून बेपत्ता असल्याची तक्रार पोलीस ठाण्यात दाखल केली होती. शोध सुरू असताना पोलिसांना वालधुनी पुलाच्या खाली रक्तबंबाळ अवस्थेत सुनेचा मृतदेह सापडला.

पोलिसांनी अधिक तपास केल्यानंतर महिलेची हत्या सासुनेच केली असल्याचे समोर आले. रुपाली विलास गांगुर्डे (वय ३५) असे हत्या करण्यात आलेल्या महिलेचे नाव आहे. लताबाई नाथा गांगुर्डे (वय) असे सासुचे नाव आहे. १ जानेवारी रोजी रुपाली यांची हत्या करण्यात आली.

सासू लताबाई हिने तिचा मित्र जगदीश म्हात्रे (वय ६०) याच्यासोबत रुपाली यांच्या हत्येचा कट रचला. रुपाली यांच्या डोक्यात रॉड मारला आणि त्यातच त्यांचा मृत्यू झाला. त्यानंतर त्यांनी रुपाली यांचा मृतदेह वालधुनी पुलाखाली फेकला.

हत्येचा आरोप आपल्यावर येऊ नये म्हणून सासूने पोलीस ठाण्यात जाऊन सून बेपत्ता असल्याची तक्रार दिली. त्यानंतर पोलिसांनी तपास सुरू केला. पोलिसांना रुपाली यांचा मृतदेह रक्तबंबाळ अवस्थेत सापडला. पोलिसांना सासूवर शंका आली. त्यानंतर लताबाई हिला ताब्यात घेतले आणि पोलीस खाक्या दाखवताच सासूने हत्येची कबुली दिली. त्यानंतर पोलिसांनी तिला अटक केली.

### सासुने सुनेची हत्या का केली?

रुपाली यांच्या हत्येचे कारण म्हणजे पैसे आणि नोकरी. रुपाली यांचे पती विलास गांगुर्डे हे रेल्वेमध्ये नोकरीला होते. सप्टेंबर २०२५ मध्ये त्यांचा मृत्यू झाला. निधनानंतर रुपाली यांना ९ ते १० लाख रुपये ग्रॅच्युएटी मिळाली. हे पैसे सासू लताबाई रुपालीकडे मागत होती. रुपाली पैसे देण्यास नकार देत होती. त्याचबरोबर विलास गांगुर्डे यांच्या निधनानंतर अनुकंप तत्त्वावर आपल्याला नोकरी मिळाली अशी लताबाई गांगुर्डेची इच्छा होती. पण, रुपाली यांनी पत्नी म्हणून अनुकंप तत्त्वावर नोकरी मिळावी, यासाठी अर्ज केला. त्यामुळे दोघींमध्ये वाद सुरू झाले.

## राज्यातील शेतकऱ्यांना नववर्षाची मोठी भेट; २ लाखांपर्यंतच्या पीक कर्जावरील मुद्रांक शुल्क माफ

# आनंदवार्ता! शेतकऱ्यांचे कर्ज होणार माफ...

**विदर्भ केसरी।**



राज्यातील लाखो शेतकऱ्यांसाठी नववर्षाची आनंदाची बातमी असून महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी शेती आणि पीक कर्जाशी संबंधित महत्त्वाचा निर्णय जाहीर केला आहे. २ लाख रुपयांपर्यंतच्या शेती अथवा पीक कर्जाच्या सर्व व्यवहारांवरील मुद्रांक शुल्क पूर्णतः माफ करण्यात आले असून हा निर्णय १ जानेवारी २०२६ पासून लागू झाला आहे. देवेंद्र फडणवीस सरकारचा जिल्हा परिषद निवडणुकांच्या आधीचा हा महत्त्वाचा निर्णय मानला जात असून, यामुळे शेतकऱ्यांच्या खिशावर पडणारा अतिरिक्त आर्थिक भार मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे.

महसूल व वन विभागाने यासंदर्भातील शासनादेश जारी केला आहे. या आदेशानुसार, २ लाख रुपयांपर्यंतच्या शेती किंवा पीक कर्जासाठी आवश्यक असणारे करारनामा, गहाणखत, तारण, हमीपत्र तसेच गहाणाची सूचना यांवर कोणतेही मुद्रांक शुल्क आकारले जाणार नाही. महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम, १९५८ मधील तरतुदींच्या आधारे हा निर्णय घेण्यात आला आहे. यापूर्वी सरकारने प्रतिज्ञापत्रांसाठी लागणारे ५०० रुपयांचे मुद्रांक शुल्क

दरम्यान, गेल्या वर्षभरात महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी शेतकरी हिताचे अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. त्यामध्ये डिजिटल ७/१२ उताऱ्याला कायदेशीर मान्यता देण्याचा निर्णय विशेष उल्लेखनीय ठरला आहे. या निर्णयामुळे शेतकऱ्यांना आता केवळ १५ रुपयांत अधिकृत ७/१२ उतारा मिळणार असून, त्यासाठी तलाठ्याची स्वाक्षरी किंवा स्टॅम्पची गरज राहिलेली नाही. 'जो लिहील तलाठी, तेच येईल भाळी' अशी जुनी म्हण आता इतिहासजमा झाल्याची भावना शेतकऱ्यांमध्ये व्यक्त होत आहे.याशिवाय, जमिनीच्या मोजणीसंबंधीही महसूल खात्याने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. पोटहिस्सा, हद्द कायम, बिनशेती, गुंठेवारी, संयुक्त भूसंपादन, वनहक्क दावे, गावठाण तसेच सीमांकन आणि मालकीहक्कासाठी आवश्यक असलेल्या मोजणी प्रकरणांचा ३० दिवसांत निपटारा करण्यासाठी परवानाधारक खाजगी भूमापकांची नियुक्ती करण्यात येणार आहे.

# 'कुकूच-कु' कंपनीच्या मालकाच्या घरावर सशस्त्र दरोडा

**विदर्भ केसरी।**

रायगड जिल्ह्यातील अलिबाग तालुक्यातील मापगाव परिसरात दरोडेखोरांनी मोठा हात मारला आहे. प्रसिद्ध 'कुकूच-कु' कंपनीचे मालक कुनाल पाथरे यांच्या घरावर अज्ञात दरोडेखोरांनी सशस्त्र दरोडा टाकून सुमारे १५ लाख रुपयांचा ऐवज लुटून नेला आहे. मध्यरात्रीच्या सुमारास घडलेल्या या धाडसी दरोड्यामुळे संपूर्ण जिल्ह्यात आणि औद्योगिक क्षेत्रात मोठी खळबळ उडाली आहे.

कुनाल पाथरे यांचे कुटुंब शुक्रवारी रात्री गाढ झोपेत असताना सुमारे दीड वाजेच्या सुमारास चोरट्यांनी घरात प्रवेश केला. कपाटे आणि ड्रॉवर उचकटत असताना आवाजाने घरातील सदस्यांना जाग आली. मात्र, चोरट्यांनी शस्त्रांचा धाक दाखवून सर्वांना धमकावले. यानंतर दरोडेखोरांनी घरातील १ लाख ५० हजारांची रोकड, सोन्या-चांदीचे दागिने आणि कुटुंबाचे मोबाईल फोन असा एकूण १५ लाखांचा ऐवज लंपास केला आणि अंधाराचा फायदा घेत पसार झाले.

पाथरे यांच्या घराच्या परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे नसल्याची बाब समोर आली आहे. नेमकी याच गोष्टीचा फायदा दरोडेखोरांनी घेतला. सीसीटीव्ही फुटेज नसल्याने आरोपींची ओळख पटवण्यात पोलिसांना अडचणी येत आहेत. मात्र, पोलिसांनी परिसरातील इतर मार्गांवरील सीसीटीव्ही आणि मोबाईल टॉवर लोकेशनच्या आधारे तपास चक्रावून सोडला आहे.

### पोलीस यंत्रणा 'अॅक्शन मोड'वर

घटनेचे गांभीर्य ओळखून जिल्हा पोलीस अधीक्षक आँचल दलाल यांनी तातडीने घटनास्थळाला भेट देऊन पाहणी केली. त्यांनी तपासाबाबत स्थानिक पोलिसांना महत्त्वाच्या सूचना दिल्या आहेत. या मोहिमेत अलिबागच्या उपविभागीय पोलीस अधिकारी माया मोरे, पोलीस निरीक्षक किशोर साळे, सोमनाथ लांडे यांच्यासह सहाय्यक पोलीस निरीक्षक भारत फार्णे आणि इतर पथक तैनात करण्यात आले आहे.

## आईने दोन वर्षांच्या मुलीचा खून करून आत्महत्या केली

पुण्यात वारजे भागात एका आईने आपल्या दोन वर्षांच्या मुलीचा गळा दाबून खून करून स्वतः आत्महत्या केली. शारवी आदिनाथ देवडकर (वय २) आणि तिची आई छाया देवडकर (वय २८) अशी मृतांची नावे आहेत. या प्रकरणी आदिनाथ संताराम देवडकर (वय ३०, रा. कारगिल फार्म हाऊसजवळ, गोकुळनगर पठार, वारजे माळवाडी) यांनी वारजे माळवाडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांच्या फिर्यादीनुसार, पत्नी छाया देवडकर हिच्याविरुद्ध मुलीचा खून केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आदिनाथ, त्यांची पत्नी छाया आणि मुलगी शारवी गोकुळनगर पठार परिसरात राहत होते. शारवीला अस्थिविकार होता आणि तिच्यावर उपचार सुरू होते. मुलीच्या आजारामुळे छाया नैराश्यात होती. २ जानेवारी रोजी आदिनाथ कामासाठी बाहेर गेले होते. दुपारी दीड वाजण्याच्या सुमारास ते कामावरून घरी परतले असता, शारवी घरातील पाळण्यात निपचित पडलेली दिसली. तिचे हात-पाय चिकटपट्टीने बांधलेले होते. पत्नी छायाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याचेही त्यांना आढळून आले. या घटनेनंतर घाबरलेल्या आदिनाथ यांनी तात्काळ पोलिसांना माहिती दिली. माहिती मिळताच सहायक पोलीस आयुक्त जानवे आणि पोलीस निरीक्षक धेंडे यांनी घटनास्थळी भेट दिली. पोलिसांनी दोघींना तातडीने रुग्णालयात दाखल केले, मात्र डॉक्टरांनी उपचारापूर्वीच त्यांना मृत घोषित केले. दोन्ही मृतदेह शवविच्छेदन तपासणीसाठी ससून रुग्णालयात पाठवण्यात आले. तपासणीत शारवीचा गळा आवळून खून करण्यात आल्याचे उघड झाले.

# रोजगार हमी योजने अंतर्गत लागवड केलेल्या हजारो वृक्षाची खुल्याआम होत आहे कत्तल

## जबाबदारी कोणत्या विभागाची शासनाचा लाखो रुपये खर्च व्यर्थ

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : प्रेमदास तायडे**

अंजनगाव सुर्जी : अंजनगाव सुर्जी तालुक्यात अनेक ग्रामीण भागातील रस्त्याने गेल्या तीन वर्षा पुर्वी रोजगार हमी योजनेअंतर्गत वृक्ष लागवड झालेले आहे, तालुक्यातील प्रत्येक ग्रामपंचायत अधिनिसत ,रोजगार सेवक ,यांनी गावातील मजूर वृक्ष लागवड कामावर लावून हा वृक्ष लागवड कार्यक्रम केला होता, काही गावातील रस्त्याने कडुलिंब चिंच, साग, व इतर वृक्षाची लागवड झाली होती तीन वर्षे हे वृक्ष लागवड सुरू होती या वृक्ष लागवडीला संबंधित प्रशासनाचा करोड रुपये खर्च तालुक्यात झालेला आहे, तीन वर्षे पूर्ण होऊन गेले, त्या नंतर वृक्षा चा ताबा कोणा कडे हाच प्रश्न आता भेडसावत आहे काही तालुक्यातील शेतकऱ्यांनी रस्त्या लगत च्या झाडाची संपूर्णता वन्य प्राण्याच्या त्रासाला कंटाळून कत्तल केल्याची दिसून येते रोजगार हमी योजनेच्या कार्यक्रमांतर्गत जो पासना केलेली वृक्ष आता कुऱ्हाडीने भुई सपाट होत आहेत, ही जबाबदारी कोणत्या विभागा कडे आहे हे अद्याप स्पष्ट झाले नाही सर्वजनिक बांधकाम विभाग, सामाजिक वनीकरण,की जिल्हा परिषद बांधकाम विभागाच्या अंतर्गत येणाऱ्या रस्त्याच्या कर्मचारी यांच्या कडे या वृक्षाची जबाबदारी घेऊन जिवंत असलेल्या वृक्षांना जीवदान देतील काय हा प्रश्न निर्माण झाला धनेगाव ते बोराळा, मार्गा वरील व जलापूर ते बोराळा सातेगाव , जवळा, जवळा बुद्रुक चिंचोली




शिंगणे कापूसतळणी, विहिगाव ते कापूसतळणी पांढरी ते खोडगाव मुरा देवी कालवाडा वरुड, मलकापूर ते सातेगाव अडगाव घोंगरडा. चौवसाळा ते चिंचोना,लखाड ते निमखेड बाजार ,अशा अनेक रस्त्या वरील वृक्षाची कत्तल झालेली आहे, सर्वात जास्त वृक्षाची हानी ,बोराळा ते जवलापूर धनेगाव मार्गावर कत्तल केल्याची दिसून आले या वृक्षाचा वारसदार कोण असा प्रश्न वृक्षप्रेमी करत आहेत



# अभय शिवाजी सातव यांचा अपघाती मृत्यू

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी**

अनसिंग : वाशिम हून अनसिंगकडे आपले काम अटपून येत असताना झालेल्या भीषण अपघातात अभय शिवाजी सातव (वय २६) यांचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. हा अपघात रात्री सुमारे २.३० वाजण्याच्या सुमारास एम.एच. ४६ बी.व्ही. ०३७४ क्रमांकाच्या 'टाटा हरिहर' नावाच्या वाहनाचा अपघात झाल्याने घडला. अभय सातव हे आपले काम आटपुन वाशिम येथून अनसिंगकडे प्रवास करत असताना हा अपघात झाला. अपघाताची माहिती मिळताच परिसरात खळबळ उडाली. स्थानिक नागरिकांनी तत्काळ मदतकार्य सुरू केले. या अपघातात अभय सातव यांचा



जागीच मृत्यू झाला असून त्यांच्यासोबत असलेले मित्र गंभीर जखमी झाले आहेत. जखमी मित्रांना उपचारासाठी वाशिम येथील लाईफ लाईन हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

घटनेची माहिती मिळताच संबंधित यंत्रणांनी घटनास्थळी धाव घेतली असून अपघाताचे नेमके कारण शोधण्यासाठी पुढील तपास सुरू आहे. अभय सातव यांच्या अकाली निधनामुळे परिसरात शोककळा पसरली आहे.

# स्त्री शक्तीचा जागर! सावित्रीबाईच्या जयंतीनिमित्त कृषि महाविद्यालय रिसोड द्वारे बालिका दिन साजरा

**रिसोड** : डॉ. पं. दे. कृ. वि. अकोला सलग्नीत सुविदे फाऊंडेशन रिसोड अंतर्गत कृषी महाविद्यालय रिसोड येथील रा.से.यो.एकक अंतर्गत क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंती निमित्त प्रशमंजुषा , व कृषि मध्ये महिलांची भुमिका, स्त्री शिक्षण मध्ये सावित्रीबाई फुले यांचे योगदान व सामाजिक कार्याबद्दल कृतज्ञता म्हणून कृषि महाविद्यालय रिसोडच्या वतीने बालिका दिन जल्लोष्यात साजरा करण्यात आला.कृषि महाविद्यालय रिसोड येथील प्रा. सिया टारपे , कु. अंजली पईणकर कु. सलोनी माळेकर यांच्या नियोजन मध्ये डॉ.ए.एम. अतुरकर प्राचार्य व श्री आर. एस. डवरे समन्वयक, डॉ. पि. जी. देव्हडे उपप्राचार्य कृषि महाविद्यालय रिसोड यांच्या शुभहस्ते क्रांतिज्योती प्रथम महिला शिक्षिका सावित्रीबाई फुले यांच्या



प्रतिमेचे पूजन करुन पुष्पहार अर्पण करण्यात आले. त्यानंतर प्रमुख अतिथी व इतर मान्यवर यांचे कु.प्रांजल इंगोले या विद्यार्थीनीनी स्वागत गीत गावून स्वागत केले. त्यानंतर कु .सिया टारपे प्राध्यापिका कृषी विस्तार विभाग कृषी महाविद्यालय रिसोड यांनी प्रास्तावीक मांडले. विद्यार्थ्यांमधून कु. रिया थोराईत, कु. कावेरी शेळके, कु.सलोनी माळेकर आणि राहुल जाधव, धीरज गवळी व शुभम हलगुंडे या विद्यार्थ्यांने क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचे स्त्री शिक्षणामध्ये व महिला मुक्ती , महिला सक्षमीकरण मध्ये मोलाचा वाटा, आणि त्यांचे सामजिक कार्य इत्यादि संदर्भात मनोगत व्यक्त केले. आर. एस. डवरे यांनी आपल्या मनोगत मधून स्त्री शिक्षण, समाजामध्ये स्त्री चे स्थान आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचे कार्य यामधून मुलींनी बोध घ्यावा असा प्रेरणादाई संदेश देऊन प्रोहत्सहित केले. प्रा. ए. बि. बाजड, प्रा एल. बि. काळे, प्रा. इरफान शेक, प्रा. सुरज माने, प्रा. गणेश हरणे, यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. ए. एम. अतुरकर प्राचार्य कृषि महाविद्यालय रिसोड यांनी आपल्या अध्येक्षीय भाषानामध्ये मुलींनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे स्त्री शिक्षण कार्य , त्याग, आणि यांचा विचार करून त्यांचे कार्य स्मरणात ठेवून त्या दृष्टीने प्रयत्नशील रहा असा प्रेरणादायी संदेश यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांस दिला .सूत्रसंचालन कु.आस्था वानखडे व स्विटी इंगळे या विद्यार्थिनींनी केले. आभार प्रदर्शन प्रा. दिपक डी. मसुरकर कार्यक्रम अधिकारी रासेयो यांनी केले. डॉ. पि. जी. देव्हडे प्रा. एन ए. खडसे, जगन बोन्डे, विठ्ठल इडोळे, सागर तोंडे सह कृषी महाविद्यालय रिसोड येथील समस्थ शिक्षक तथा शिक्षकेत्तर कर्मचारी यांची कार्यक्रम यशस्वीतेकरिता उपस्थीती व सहकार्य लाभले

# स्पर्धा परीक्षा, प्रेरणा आणी यशाचा संगम;सौ.योगिता पिपरे यांच्या मार्गदर्शनातून युवकांच्या भवितव्याला नवी दिशा!

## सावित्रीबाई फुले जयंती व नववर्ष २०२६ निमित्त पोलीस भरती महालेखी स्पर्धेचा भव्य बक्षीस वितरण सोहळा संपन्न!

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : विनोद सेलोटे**

गडचिरोली : इंदिरानगर येथे सावित्रीबाई फुले जयंती व नववर्ष २०२६ चे औचित्य साधून SM स्पर्धा परीक्षा केंद्र, इंदिरानगर, गडचिरोली यांच्या वतीने दि. ०३/०१/२०२६ रोजी (शनिवार) पोलीस भरती महालेखी स्पर्धेचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेला जिल्ह्यातील युवक-युवतींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. स्पर्धेचा निकाल व बक्षीस वितरण सोहळा दि. ०४/०१/२०२६ रोजी (रविवार) उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. आमदार डॉ. मिलिंदभाऊ नरोटे होते. कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून मा. सौ. योगिता प्रमोद पिपरे (जिल्हाध्यक्ष, भाजपा महिला आघाडी, गडचिरोली तथा माजी नगराध्यक्षा) यांची विशेष उपस्थिती लाभली. तसेच मा. श्री. प्रमोद पिपरे (भाजपा लोकसभा समन्वयक तथा संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्यादित, पुणे), मा. रमेश भुरसे (प्रदेश सचिव, भाजपा किसान मोर्चा), मा. श्री. अनिल कुणघाडकर (भाजपा शहर अध्यक्ष तथा नगरसेवक), मा. श्री. हर्षल गेडाम (नगरसेवक) व मा. श्री. अनिल तिडके यांची उपस्थिती होती.

### सौ. योगिता प्रमोद पिपरे यांचे प्रेरणादायी व दिशादर्शक मार्गदर्शन

■ कार्यक्रमात सौ. योगिता प्रमोद पिपरे यांनी अत्यंत प्रभावी व प्रेरणादायी मार्गदर्शन करताना सांगितले की, "पोलीस भरती ही केवळ नोकरी मिळविण्याची प्रक्रिया नसून ती समाजसेवा, शिस्त आणि कर्तव्यभावनेचे प्रतीक आहे. आजच्या स्पर्धात्मक युगात विद्यार्थ्यांनी कठोर परिश्रम, सातत्य आणि सकारात्मक दृष्टिकोन ठेवून तयारी केली पाहिजे. सावित्रीबाई फुले यांनी शिक्षणाच्या माध्यमातून समाजाला परिवर्तनाची दिशा दिली; त्याच विचारांचा वारसा पुढे नेण्याची जबाबदारी आजच्या पिढीवर आहे." त्यांच्या या ओघवत्या व आत्मविश्वास वाढविणाऱ्या विचारांनी उपस्थित स्पर्धकांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून अनेक विद्यार्थ्यांनी त्यांच्या मार्गदर्शनामुळे नव्याने प्रेरणा मिळाल्याची भावना व्यक्त केली.

यावेळी स्पर्धेत प्राविण्य प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रथम, द्वितीय, तृतीय तसेच प्रोत्साहनपर बक्षिसे मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आली. यशस्वी स्पर्धकांचे उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात अभिनंदन केले.

गुणवत्तापूर्ण मार्गदर्शनाची मजबूत परंपरा या संपूर्ण उपक्रमाचे संचालक व मार्गदर्शक स्वप्नील मडावी सर यांनी स्पर्धेचे नियोजन अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने केले. त्यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेसाठी योग्य अभ्यासक्रम, वेळेचे नियोजन व आत्मपरीक्षणाचे महत्त्व पटवून दिले. अशा स्पर्धांमुळे ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांना आपली गुणवत्ता सिद्ध करण्याची संधी मिळते, असे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाचे आयोजन अत्यंत यशस्वीरीत्या पार पडले. उपस्थित मान्यवरांनी SM स्पर्धा परीक्षा केंद्र व आयोजकांचे कौतुक करत भविष्यातही अशा उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी शुभेच्छा दिल्या.







## ▶ संक्षीप्त







### क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती सोहळा मोठ्या उत्साहात साजरा

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : प्रल्हाद मेश्राम**

देसाईगंज : कोंढाळा (3 जानेवारी )माळी समाज सेवा संस्था कोंढाळा यांच्या वतीने 'विकासगंगा आणू चला, जनजागरणासाठी पाऊल उचला' या ध्येयानुसार क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीचा सोहळा अत्यंत उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमाचे उद्घाटन आमदार श्री. रामदासजी मसराम यांच्या शुभहस्ते पार पडले. यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना त्यांनी सावित्रीबाई फुले यांच्या सामाजिक आणि शैक्षणिक क्रांतीचा वारसा पुढे नेण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित, मा. भाग्यवानजी खोब्रागडे, माजी सभापती मा. परसराम टिकले, माजी उपसभापती नितीन राऊत, मा. धनपालजी मिसार सर,मा. अपर्णा राऊत (सरपंच), मा. गजानन सेलोटे (उपसरपंच) , मा. रोषणीताई पारधी (माजी सभापती जिल्हा परिषद), मा. दिलीप राऊत (माजी उपसभापती), मा. कैलासजी राणे (माजी सरपंच),मा. कडू सर (मुख्याध्यापक लो. वि.), मा. किरणताई कुंभलवार, मा. हरीभाऊ पत्रे (अध्यक्ष तंटामुक्ती), मा. सुनीलभाऊ पारधी (तालुका अध्यक्ष भाजप), मा. पवनभाऊ खोब्रागडे, मा. पांडुरंग बुराडे (ग्रामसेवक), मा. सुनीलजी धकाते (ग्रा. पं. अधिकारी), मा. योगेश ढोरे (मुख्याध्यापक जि. प. कोंढाळा), मा. आदे सर, मा. श्रीरामजी बुराडे, मा. अरुणभाऊ कुंभलवार, मा. आनंदजी गुरनुले, माणिक वाढई, श्रीरामजी लटुरे, नामदेव वसाके, अनिता शेंडे तसेच स्थानिक नागरिक, आरोग्य विभाग आणि शिक्षण क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन माळी समाज सेवा संस्था कोंढाळाच्या वतीने करण्यात आले.





### मुडझा येथे सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे**

गडचिरोली : माळी समाज मंडळ मुडझाच्या वतिने सावित्रीबाई फुले जयंती कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वंचित बहुजन आघाडीचे निरीक्षक जी. के. बारसिंगे होते तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून वंचितचे पूर्व विदर्भ समन्वयक तथा नगरसेवक बाळू टेंभुर्णे उपस्थित होते. या प्रसंगी प्रमख पाहुणे म्हणून जि प शाळेच्या मुख्याध्यापीका सौ चन्नावार, सरपंच शशिकांत कोवे, निर्मलाताई जेंगठे, उपसरपंच शोभाताई जेंगठे, पोलिस पाटील लोचनताई मेश्राम, पितांबर कुंदलवार, रेवताताई सोनुले आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरूवात जि. प. शाळेतील विद्यार्थ्यांनी गावात प्रभातफेरी काढून महापुरुषांच्या नावाच्या घोषणा देत केली. यावेळी मार्गदर्शन करतांना बाळू टेंभुर्णे यांनी सावित्रीमाईच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकून समस्त समाज बांधवांनी सावित्रीबाई फुलेंची विचारसरणी अंगिकारून आचरणात आणावे व मनुवादी व्यवस्थेचा बिमोड करावा असेही त्यांनी म्हटले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष जी. के. बारसिंगे व उपस्थित पाहुण्यांनी सुद्धा आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी जिल्हा स्तरीय क्रिडा सामन्यात मुडजा येथिल जि प शाळेने खो- खो सामन्यात प्रथम क्रमांचे विजय प्राप्त केल्यामूळे माळी समाज मंडळाच्या वतिने सर्व खेळाळूंचे व शिक्षकांचे बाळू टेंभुर्णे यांच्या हस्ते शिल्ड व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन जि. प. शाळेच्या शिक्षीका स्मिता जांभूळकर यांनी केले तर आभार राजेंद्र गंडाटे शिक्षक यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी लहुजी सोनुले, योगाजी जेंगठे, बालाजी सोनुले, रेवताताई जेंगठे,प्रमोद उमरगुडावार, लोकेश जेंगठे, निखील जेंगठे, जगदिश जेंगठे, तरूण लोनबले, खुबसुरत दाणे, सुरज सोनुले, नयन जेंगठे, शुभम गडपायले, आशिष निकुरे यांनी परिश्रम घेतले. यावेळी गावातील नागरिकांची लक्षणीय उपस्थिती होती.



### मौशिखांब जिल्हा परिषद शाळेत सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त बालिका दिन उत्साहात

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : मंगेश सहारे**

क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त ३ जानेवारी रोजी मौशिखांब येथील जिल्हा परिषद शाळेत बालिका दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. स्त्री शिक्षणाच्या जननी सावित्रीबाई फुले यांच्या कार्याला अभिवादन करत, विद्यार्थिनींमध्ये शिक्षणाची गोडी, आत्मविश्वास व स्वावलंबनाची जाणीव निर्माण करण्याच्या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री. जगदीश पा. बोरकुटे होते. प्रमुख उपस्थितीत शाळेचे मुख्याध्यापक श्री. आवारी सर तसेच श्री. गजल्लवार सर, श्री. भुरशे सर, चौधरी सर, पेटकर मॅडम, लाकूडवाहे मॅडम उपस्थित होते. याशिवाय शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य श्री. शशिकांत कुकुडकार, इतर सदस्य तसेच पालकवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. कार्यक्रमाची सुरुवात सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. मान्यवरांनी आपल्या भाषणातून सावित्रीबाई फुले यांनी स्त्री शिक्षणासाठी केलेल्या संघर्षाची माहिती देत, आजच्या काळात बालिकांचे शिक्षण हे कुटुंब व समाजाच्या प्रगतीचे भक्कम माध्यम असल्याचे प्रतिपादन केले. शिक्षण घेतलेल्या मुली समाजात सकारात्मक बदल घडवू शकतात, असेही त्यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना सांगितले.

यावेळी विद्यार्थिनींनी विविध उपक्रमांतून सहभाग नोंदवत आपले विचार मांडले. बालिकांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळा व पालकांनी एकत्रित प्रयत्न करावेत, असे आवाहन मान्यवरांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी शिक्षकवृंद, शाळा व्यवस्थापन समिती व पालकवर्ग यांनी विशेष परिश्रम घेतले.

## सासरच्या छळाला कंटाळून महिलेची आत्महत्या : पतीवर गुन्हा दाखल



पुणे : सासरच्या छळामुळे महिलेने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना हडपसर भागात घडली. याप्रकरणी सासू-सासऱ्यासह आजेसासूला फुरसुंगी पोलिसांनी अटक केली. पूनम युवराज लष्करे (वय २२, रा. शेवाळवाडी, ऊरळी देवाची, हडपसर-सासवड रस्ता) असे आत्महत्या केलेल्या महिलेचे नाव आहे. याप्रकरणी सासू तारा लष्करे, सासरे संतोष, आजेसासू बायडाबाई यांना अटक करण्यात आली. याप्रकरणी पूनमच्या पतीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पूनमच्या वडिलांनी फुरसुंगी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पूनमचा पती रिक्षाचालक आहे. विवाहानंतर मूलं होत नसल्याने सासू, सासरे, आजेसासूनने तिचा छळ सुरू केला. पतीने रिक्षा खरेदी करण्यासाठी माहेरहून पैसे आणण्याची मागणी केली. छळामुळे पूनमने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. सहायक पोलीस निरीक्षक किशोर पवार पुढील तपास करत आहेत.

## संक्षीप्त




### नवसंजीवनी सार्वजनिक वाचनालय येथे क्रांतीज्योती सावित्रीआई फुले जयंती

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : प्रल्हाद मेश्राम**

देसाईगंज : दरवर्षी प्रमाणे यावर्षी सुद्धा नवसंजीवनी सार्वजनिक वाचनालय देऊळगाव (खरमतटोला) येथे भारत देशाच्या आद्य शिक्षिका, ज्ञानदायिनी क्रांतीज्योती सावित्रीआई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. या शुभ प्रसंगी वाचनालयाचे अध्यक्ष संतोष ठलाल, सदस्य निर्मला ठलाल, तनुजा लाडे, लिला गोरटकर, विकास खुणे, मालूबाई मुर्वतकार, सुरज गोरटकर प्रामुख्याने उपस्थित होते. याप्रसंगी साहित्यिक, सामाजिक कार्यकर्त्या संगीता ठलाल यांनी क्रांतीज्योती सावित्रीआई फुले यांच्या जीवनावर प्रकाश टाकला. उपस्थित मान्यवरांनी क्रांतीज्योती सावित्रीआई फुले यांना अभिवादन केले.









### युवकांच्या हक्क मारणाऱ्या बोगस लोकांना ओळखून, त्यांना त्यांची जागा दाखवण्याची गरज - अ‍ॅड. मुकेशदादा पेंदाम

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : प्रल्हाद मेश्राम**

देसाईगंज : दिनांक 3 जानेवारीला देवलापार क्षेत्रातील खिड़की गावात झालेल्या सतरंगी झुंडा गोंगो तथा कोयापुनेम जनजागृती कार्यक्रमात अ‍ॅड मुकेशदादा पेंदाम (मुर्सेनाल,नेशनल गोंडवाना सोडूम संघटन) यांनी मार्गदर्शन करताना दिवस रात्र नोकरी मिळवण्यासाठी मेहनत करणाऱ्या युवकांच्या हक्क मारणाऱ्या बोगस लोकांना ओळखून, त्यांना त्यांची जागा दाखवण्याची गरज असल्याचे सांगीतले. या क्षणी अन्य वक्त्यांनी सुद्धा आपले विचार व्यक्त केले. ज्यात हरिशजी उईके (माजी जि.प. सदस्य), ताराचंदजी सलामें (ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ता), उमेशजी भंडारकर (माजी सरपंच, ग्राम पंचायत बेलदा), चिंतामण वरखडे, निखिल खंडाते (एम एच बी ग्रुप), रोहित उईके, अनिता खंडाते, उइकेजी (पोलिस पाटील), मोईन पठाण, संदीप इनवाते, मोंढे सर, किरण सलामे व इतर मान्यवर इत्यादी प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कार्यकर्ते गेंदलाल उईके, परसराम खंडाते, तथा एमएचबी ग्रुपच्या सदस्यांनी अथक परिश्रम घेतले.







### कोरची प्रीमियर लिग २०२६ क्रिकेट स्पर्धेचे भव्य उद्घाटन संपन्न

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : प्रल्हाद मेश्राम**

देसाईगंज : कोरची प्रीमियर लिग २०२६ अंतर्गत आयोजित क्रिकेटच्या महासंग्रामास दिनांक ०२ जानेवारीपासून उत्साहात सुरुवात झाली आहे. दररोज सायंकाळी ६.०० वाजेपासून होणाऱ्या या स्पर्धेचे आयोजन दिनांक १३ जानेवारी २०२६ पर्यंत करण्यात आले असून, ही स्पर्धा लगान क्रिकेट ग्राउंड, फवारा चौक, कोरची येथे सुरू आहे. या क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन आमदार श्री. रामदासजी मसराम यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी त्यांनी खेळामुळे युवकांमध्ये शिस्त, संघभावना व आरोग्याबाबत जागरूकता निर्माण होते, असे मत व्यक्त केले. स्पर्धेमध्ये विविध संघ सहभागी झाले असून, क्रिकेटप्रेमींमध्ये मोठा उत्साह पाहायला मिळत आहे. परिसरातील नागरिक, खेळाडू व क्रीडाप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. आयोजकांनी स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी परिश्रम घेतले. त्या प्रसंगी उपस्थित माजी आमदार कृष्णा गजबे, काँग्रेस कमिटी तालुकाध्यक्ष कोरची मनोज अग्रवाल, माजी सभापती परसरामजी टिकले, नगराध्यक्षा नगर परिषद कोरची हर्षलताताई भैसारे, तहसीलदार प्रशांत गड्डम, सदरुभाई भामानी उपस्थित होते.

# कीटकनाशक प्राशन केल्याने चांभार्डा येथील शेतक-याचा मृत्यू

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : विनोद सेलोटे**

गडचिरोली : तालुक्यातील चांभार्डा येथील ५५ वर्षीय शेतकऱ्याचा कीटकनाशक प्राशन केल्याने दुर्दैवी मृत्यू झाला आहे. रमेश तुकाराम मडावी (वय ५५ वर्षे ), रा. चांभार्डा असे मृत शेतकऱ्याचे नाव आहे. शनिवारी पहाटे ४:१५ च्या सुमारास जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

रमेश मडावी यांनी गुरुवारी सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास गावापासून एक किलोमीटर अंतरावर रस्त्यावरच कीटकनाशक प्राशन केले. त्यांच्या पत्नीला याबाबत माहिती मिळाल्यावर त्यांनी वॉर्डातील काही स्थानिकांच्या मदतीने घटनास्थळ गाठले. या घटनेची माहिती गडचिरोली पोलिस ठाण्यात दिली गेली, ज्यामध्ये आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली. पोलिसांनी आत्महत्येच्या कारणाचा शोध घेत आहेत. विष प्राशन केल्यानंतर रमेश मडावी यांना दुचाकीने अमिर्झा प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले. त्यांच्या प्रकृतीत सुधारणा होण्याऐवजी अधीकच गंभीर होत गेली, ज्यामुळे त्यांना त्वरित जिल्हा रुग्णालयात रुग्णवाहिकेने नेण्यात आले. मात्र, उपचारादरम्यान त्यांची स्थिती अधिकच खालावली आणि शनिवारी पहाटे त्यांचा मृत्यू झाला. रमेश मडावी यांच्यासोबत पत्नी आणि मुलगी असून, रमेश मडावी हे वीजदुरुस्तीची कामेही करत होते. आत्महत्येचे कारण अद्याप स्पष्ट होऊ शकले नाही. पोलिसांनी या प्रकरणाची तपासणी सुरू केली असून, त्यांच्या कुटुंबीयांसाठी शोक व्यक्त केला जात आहे. रमेश मडावी यांच्या आत्महत्येच्या कारणांचा शोध सुरू आहे. सध्या पोलिसांनी या घटनेला लागलेली सर्व शक्यतांवर विचार करण्यास प्रारंभ केला आहे. याप्रकरणी अधिक तपास सुरु असून, कुटुंबीयांचे वडीलधाऱ्यांकडुन कोणत्याही प्रकारची मदत केली जात आहे.

**कुटुंबीयांसाठी शोक व्यक्त**

▪ रमेश मडावी यांच्या दुर्दैवी निधनामुळे त्यांच्या कुटुंबीयांना मोठा धक्का बसला असुन, त्यांच्या पत्नी व मुलगी यांना यावरून मोठा मानसिक त्रास होण्याची शक्यता आहे. ग्रामस्थ व नातेवाईकांनाही या घटनेमुळे दुःख झाले आहे. कृषी क्षेत्रात कीटकनाशकांचा वापर, ही घटना शेतकऱ्यांच्या जीवनातील कठीण परिस्थितीला दर्शवते, जेव्हा कीटकनाशकांचा वापर केल्यानंतर काही वेळा अवांछित परिणाम होऊ शकतात. शेतकऱ्यांनी आपल्या सुरक्षा बाबींचे पालन करणे आणि कीटकनाशक वापरतांना अत्यंत काळजी घेतली पाहिजे.



# सुगंधित तंबाखू पोहोचविणा-या कारवर अहेरी पोलिसांची धडक कारवाई...!

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : विनोद सेलोटे**

अहेरी : खऱ्यासाठी वापरल्या जाणाऱ्या प्रतिबंधित सुगंधी तंबाखूची वाहतूक करणाऱ्या कारला अहेरी पोलिसांनी अडवून दोन जणांना ताब्यात घेतले. ही कारवाई गेर्रा फाट्यापासून 3 किलोमीटरवर करण्यात आली. या कारवाईत 2 लाख 71 हजार 200 रुपयांचा सुगंधित तंबाखू आणि 4 लाख रुपयांची मारुती कार असा एकूण 6 लाख 71 हजार 200 रुपयांचा ऐवज जप्त करण्यात आला.

अहेरी पोलिसांना या सुगंधित तंबाखूच्या वाहतुकीची माहिती खबरींमार्फत मिळाली होती. त्यानुसार नाकाबंदी करून सदर कार (क्रमांक एमएच 33, एसी 2024) अडविण्यात आली. कारची तपासणी केली असता त्यात 240 डबे मजा 108 हा सुगंधित तंबाखू होता. त्यामुळे कारमधील आरोपी सोहेल सिराज खान पठाण (रा.आलापल्ली) आणि इसरार हुसेन शेख (दुकानदार, आलापल्ली बाजारवाडी) यांना पोलिसांनी ताब्यात घेतले. हा प्रतिबंधीत तंबाखू कुठून आणला, कोणाकडे जात होता याचा तपास पोलीस करत आहेत.

याप्रकरणी आरोपींविरोधात कलम 123, 274, 277, 278 आणि 3(5) बीएनएस अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. ही कारवाई अहेरीचे ठाणेदार हर्षल एकरे यांच्या मार्गदर्शनात अहेरी ठाण्याच्या पथकाने केली.

# जिल्हा स्तरीय भव्य विज्ञान दिंडी उत्साहात

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : विनोद सेलोटे**



अहेरी : विज्ञान घडवते भविष्य, अंधश्रद्धा सोडा, विज्ञान जोडा आणि प्रश्न विचारा, प्रयोग करा अशा घोषणांनी अहेरी नगरी दुमदुमून गेली. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करणे व समाजात विज्ञानाविषयी जनजागृती घडवून आणण्याच्या उद्देशाने आयोजित जिल्हा स्तरीय भव्य विज्ञान दिंडी मोठ्या उत्साहात पार पडली.

शनिवार, ४ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ९ वाजता स्थानिक हॉकी ग्राउंड येथून विज्ञान दिंडीचा प्रारंभ करण्यात आला. अहेरीच्या नगराध्यक्षा रोजा करपेत व गटशिक्षणाधिकारी सुनील आईंचवार यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून दिंडीला सुरुवात झाली. अहेरी परिसरातील विविध शाळा व महाविद्यालयांमधील शेकडो विद्यार्थ्यांनी पारंपरिक वेशभूषा परिधान करून तसेच विविध वैज्ञानिक मॉडेल्स, माहितीपूर्ण तक्ते व फलकांसह दिंडीत सहभाग नोंदवला. शहराच्या मुख्य मार्गावरून मार्गक्रमण करत असताना नागरिकांनी ठिकठिकाणी विद्यार्थ्यांच्या कल्पकतेचे व उपक्रमशीलतेचे कौतुक केले. अहेरीच्या मुख्य चौकात या विज्ञान दिंडीचा समारोप करण्यात आला. या कार्यक्रमात शिक्षणाधिकारी (माध्यमिक) वासुदेव भुसे, उपशिक्षणाधिकारी अमरशिंग गेडाम, डायटचे प्राचार्य बळीराम चौरे यांनी प्रत्यक्ष सहभाग घेऊन विद्यार्थ्यांचा उत्साह वाढवला.

विज्ञान दिंडीचे मुख्य आकर्षण म्हणजे विद्यार्थ्यांनी सादर केलेली सौर ऊर्जा, पर्यावरण संरक्षण, जलसंधारण तसेच दैनंदिन जीवनातील विज्ञानावर आधारित विविध मॉडेल्स व प्रात्यक्षिके होत. लेझीम पथक, घोषणाबाजी आणि वैज्ञानिक संदेश देणाऱ्या फलकांमुळे संपूर्ण परिसरात विज्ञानाचा जागर निर्माण झाला. केवळ पुस्तकी ज्ञानापुरते मर्यादित न राहता विद्यार्थ्यांनी प्रश्न विचारण्याची सवय लावली पाहिजे. प्रयोगशील राहिल्यानेच खऱ्या अर्थाने वैज्ञानिक दृष्टिकोन रुजतो. अशा उपक्रमांतूनच उद्याचे शास्त्रज्ञ घडतील, असे मत शिक्षणाधिकारी वासुदेव भुसे यांनी व्यक्त केले. या विज्ञान दिंडीत अंधश्रद्धा निर्मूलनाचा ठळक संदेश देण्यात आला. चमत्कारांमागील वैज्ञानिक सत्य उलगडून दाखवणाऱ्या फलकांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले. या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाविषयी नवा उत्साह व आत्मविश्वास निर्माण झाल्याचे चित्र दिसून आले.

या कार्यक्रमास माध्यमिक शिक्षणाधिकारी वासुदेव भुसे, उपशिक्षणाधिकारी अमरशिंग गेडाम, डायट प्राचार्य बळीराम चौरे, गटशिक्षणाधिकारी सुनील आईंचवार, नगराध्यक्षा रोजा करपेत यांच्यासह विविध शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक-शिक्षिका, कर्मचारी व शेकडो विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जिल्हा शिक्षण विभाग व स्थानिक शिक्षकांनी विशेष परिश्रम घेतले. अहेरीतील ही जिल्हा स्तरीय विज्ञान दिंडी केवळ मिरवणूक न ठरता, समाजात वैज्ञानिक विचारांची रुजवणूक करणारी प्रभावी चळवळ ठरल्याचे मत नागरिकांनी व्यक्त केले.

# नवरगावांत भव्य संस्कृतीदर्शन शोभायात्रेत विविध देखाव्याचे दर्शन

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : विनोद सेलोटे**

सिंदेवाही : सिंदेवाही तालुक्यातील नवरगाव भारतीय शिक्षण संस्थेच्या अमृत महोत्सवनिमित्त आणि संस्थापक अध्यक्ष स्व. बालाजी पाटील बोरकर शतकोत्तर रौप्य महोत्सवी जयंती निमीत्य नवरगाव येथे भव्य संस्कृतीदर्शन शोभायात्रा शुक्रवार २ जानेवारी ला काढण्यात आली.

शोभायात्रेमध्ये घटक संस्थेत शिक्षण घेतं असलेले जवळ जवळ चार हजार विध्यार्थी सहभागी झाले असल्याने शोभायात्रेची लांबी जवळजवळ एक किमी दिसून आली त्यात घटक संस्थेतील. भारत विद्यालय नवरगाव, भारत विद्यालय पळसगाव (जाट), श्री ज्ञानेश महाविद्यालय नवरगाव, ज्ञानेश चित्रकला महाविद्यालय, स्व. बालाजी पाटील बोरकर कनिष्ठ महाविद्यालय नवरगाव मध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या विविध विषयावर आधारित शोभयात्रेचे आयोजन करण्यात आले. सदर शोभायात्रा सकाळी ८ वाजता भारत विद्यालयातून निघालीआणि तीन तास गावातील प्रमुख मार्गाने प्रदर्शन केले. यात स्व. बालाजी पाटील यांचा स्मृती रथ, ग्रंथदिंडी, संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलीची पालखी, शिवरायांच्या मावळ्यांचे दृश्य, राजमाता जिजाऊ शिवाजीसह जिंवत घोड्यावर स्वार असलेले दृश्य, गौतम बुद्धाचे दृश्य, भारतीय संविधान दृष्य, चित्रकाराचे दृश्य, आदिवासी रेला नृत्य आणि प्राणी आणि मनुष्य संघर्ष यांचा प्रत्यक्ष देखावा दाखवून प्रबोधन केला.

ही शोभायात्रा प्रत्येक चौकात प्रदर्शन करुन प्रबोधन करीत मार्गक्रमण केल्याने शोभयात्रेसह अमृत महोत्सवाचे स्वागत करण्यासाठी संपूर्ण गावात रांगोळी, शुभेच्छा फलक आणि प्रवेशद्वार उभे करण्यात आले होते. या भव्य शोभयात्रेला बघण्यासाठी सर्व जनतेने रस्त्यारस्त्यावर उपस्थित राहुन शोभायात्रेतील विलोभणीय दर्शन घेतले. सदर शोभा यात्रा यशस्वी करण्यासाठी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष जयंत बोरकर आणि सचिव सदानंद बोरकर श्री ज्ञानेश महाविद्यालयाचे प्राचार्य अमृत लंझे व महाविद्यालयाचे, भारत शाळेचे शिक्षक, पदाधिकारी तथा सर्व घटक संस्थेच्या कर्मचाऱ्यांनी मोलाचे परिश्रम घेतले.





# उदय धकाते, तिलोत्तमा हाजरा संयोजकपदी...!

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : विनोद सेलोटे**




गडचिरोली : जिल्ह्यातील पत्रकारांच्या संघटनात्मक बळकटीसाठी महत्त्वपूर्ण टप्पा ठरत गडचिरोली ऑल मीडिया असोसिएशनच्या नव्या कार्यकारिणीची निवड नुकतीच करण्यात आली. जिल्ह्यातील मुद्रित, इलेक्ट्रॉनिक तसेच डिजिटल माध्यमांतील पत्रकारांचा समावेश असलेली ही कार्यकारिणी पत्रकारांचे हक्क, स्वातंत्र्य व सुरक्षिततेसाठी अधिक प्रभावीपणे कार्य करणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे. या निवड प्रक्रियेत महाभारत न्यूज पोर्टलचे संपादक उदय धकाते यांची संयोजकपदी फेरनिवड करण्यात आली असून, ग्लोबल गडचिरोली न्यूजच्या मुख्य संपादिका तिलोत्तमा समर हाजरा यांची संयोजकपदी निवड करण्यात आली आहे. नव्या नेतृत्वामुळे संघटनेच्या कार्याला नवी दिशा मिळेल, अशी अपेक्षा पत्रकार बांधवांतून व्यक्त होत आहे. नव्या कार्यकारिणीत जिल्ह्यातील विविध वृत्तसंस्था, वृत्तपत्रे व न्यूज पोर्टल्सचे प्रतिनिधित्व करणाऱ्या पत्रकारांचा समावेश करण्यात आला आहे. सभासद म्हणून जयंत निमगडे (संपादक, गडचिरोली वार्ता), व्यंकटेश दुडमवार (जिल्हा प्रतिनिधी, आज तक चॅनेल), अस्मिता दुडमवार (मुख्य संपादिका, गोंडवाना टाईम्स), प्रा. श्रीमंत सुरपाम (संपादक, एस भारत न्यूज), अनिल बोदलकर (संपादक, एव्हीबी न्यूज), निलेश सातपुते (लोकवृत्त), सुरज हजारे (के विदर्भन्यूज), किशोर खेवले (लोक प्रवाह), कृष्णा वाघाडे (न्यू प्राणहिता न्यूज), मशाखेत्री (विदर्भ क्रांती न्यूज), हिताश्री जिवतोडे (द गडविश्व) आणि प्रविण चन्नावार (वृत्तवाणी) यांची निवड करण्यात आली आहे. नव्या कार्यकारिणीच्या माध्यमातून जिल्ह्यातील पत्रकारांचे प्रश्न, व्यावसायिक अडचणी, हक्क, स्वातंत्र्य आणि सुरक्षिततेसाठी संघटना अधिक सक्षमपणे काम करेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. पत्रकारांमध्ये समन्वय, एकजूट व व्यावसायिक मूल्यांची जपणूक करत लोकशाहीचा चौथा स्तंभ अधिक बळकट करण्याचा निर्धारही नव्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

# यश–अपयशाला न जुमानता संघर्षासाठी सज्ज व्हा

## महेंद्र ब्राह्मणवाडे यांचे कार्यकर्त्यांना आवाहन : काँग्रेसतर्फे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती व नवनियुक्त नगरसेवकांचा सत्कार

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : प्रल्हाद मेश्राम**

देसाईगंज : गडचिरोली जिल्हा महिला काँग्रेस कमिटीच्या वतीने जिल्हा काँग्रेस कार्यालयात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त जयंती कार्यक्रम तसेच काँग्रेसच्या नवनियुक्त नगरसेवकांचा जाहीर सत्कार सोहळा उत्साहात पार पडला. यावेळी अध्यक्षस्थानावरून बोलताना गडचिरोली जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष महेंद्र ब्राह्मणवाडे म्हणाले की, आयुष्यात यश–अपयश हे येतच असते; मात्र अपयशाला न जुमानता ज्या पद्धतीने ज्ञानज्योती माता सावित्रीबाई फुले यांनी संघर्ष करून महिलांसाठी शिक्षणाची दारे खुली केली, त्याच प्रेरणेतून आपण सर्वांनी समाजासाठी आणि संघटनेसाठी सदैव संघर्षासाठी सज्ज राहिले पाहिजे. असे आवाहन त्यांनी काँग्रेस कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांना केले. या कार्यक्रमास विशेष अतिथी म्हणून माजी जि. प. उपाध्यक्ष मनोहर पा. पोरेटी, माजी नगराध्यक्ष अ‍ॅड. रामभाऊ मेश्राम, अखिल भारतीय आदिवासी काँग्रेसच्या राष्ट्रीय सचिव कुसुमताई आलाम, अखिल भारतीय युवक काँग्रेसचे राष्ट्रीय सचिव अ‍ॅड. विश्वजित कोवासे, रोजगार सेल जिल्हा कार्याध्यक्ष पुष्पलताताई कुमरे, काँग्रेस नेते प्रभाकर वासेकर, नेत्या आशाताई तुलावी, शहर अध्यक्ष तथा नगरसेवक सतीश विधाते, नगरसेवक रमेश चौधरी, माजी सभापती विजय गोरडवार, जिल्हा उपाध्यक्ष नेताजी गावतुरे, गडचिरोली तालुकाध्यक्ष वसंत राऊत, वडसा तालुकाध्यक्ष राजेंद्र बुल्ले, आरमोरी तालुकाध्यक्ष मिलिंद खोब्रागडे, युवक काँग्रेस जिल्हाध्यक्ष नितेश राठोड, गडचिरोली तालुका महिला काँग्रेस अध्यक्ष कल्पना नंदेश्वर, पौर्णिमाताई भडके, कविताताई उराडे, रीताताई गोवर्धन, शेवंताताई हलामी, माजी नगरसेविका मीनल चिमूरकर, मंजुताई आत्राम, शीतलताई ठवरे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. यावेळी गडचिरोली नगरपरिषदेचे नवनियुक्त नगरसेवक सतीशजी विधाते, श्रीकांतजी देशमुख, रमेशजी चौधरी, परागजी पोरेड्डीवार, सौ. मनीषाताई खेवले, मेघाताई वरगंटिवार; आरमोरी नगरपरिषदेचे नवनिर्वाचित नगरसेवक अक्षयजी बागडे, माणिकजी भोयर, सौ. लताताई डोकरे, सौ. मेघाताई मने; तसेच वडसा (देसाईगंज) नगरपरिषदेचे नवनिर्वाचित नगरसेवक विकासजी प्रधान, शामजी उईके, सौ. राधिकाताई पत्रे, सौ. मंदाताई समर्थ, सौ. गुरमितकौरताई चावला, सौ. आशाताई दहिवले, सौ. फैमीदाताई पठाण यांचा मान्यवरांच्या हस्ते जाहीर सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास मोठ्या संख्येने काँग्रेस कार्यकर्ते, पदाधिकारी व महिला भगिनी उपस्थित होत्या.











# पाहिजेत

'दैनिक विदर्भ केसरी' या अग्रगण्य मराठी वृत्तपत्राचा विस्तार संपूर्ण विदर्भात होत आहे. लोकशाहीचा चौथा स्तंभ बळकट करण्यासाठी आणि जनसामान्यांचे प्रश्न मांडण्यासाठी आम्हाला विदर्भातील प्रत्येक जिल्हा आणि तालुका पातळीवर
उत्साही, कल्पक आणि अनुभवी 'बातमीदार/प्रतिनिधी' नियुक्त करणे आहे.

## खालील सर्व जिल्हे आणि त्यांच्या अंतर्गत येणाऱ्या प्रत्येक तालुक्यासाठी प्रत्येकी १ प्रतिनिधीची नियुक्त करणे आहे

### नागपूर
**जिल्हा प्रतिनिधी**
- नागपूर शहर,
- काटोल, नरखेड,
- सावनेर, रामटेक,
- हिंगणा, उमरेड इ.

### अमरावती
**जिल्हा प्रतिनिधी**
- अमरावती शहर, अंजनगाव सुर्जी,
- चांदूर बाजार, मोर्शी
- धामणगाव रेल्वे, चांदुर रेल्वे,
- मोर्शी, तिवसा, वरुड, इतर

### अकोला
**जिल्हा प्रतिनिधी**
- अकोला शहर, अकोट,
- बाळापूर, पातूर,
- तेल्हारा, इ.

### यवतमाळ
**जिल्हा प्रतिनिधी**
- यवतमाळ शहर दिग्रस,
- दारव्हा,वणी,
- पांढरकवडा, आर्णी इ.

### बुलढाणा
**जिल्हा प्रतिनिधी**
- बुलढाणा, चिखली,
- खामगाव, शेगाव,
- मलकापूर, देऊळगाव
- राजा इ.

### चंद्रपूर
- चंद्रपूर शहर,
- बल्लारपूर,
- वरोरा, भद्रावती,
- राजुरा, ब्रह्मपुरी



### आकर्षक वेतन

**संगणक चालक पेज डिझायनर.**

- कोरल
- फोटोशॉप
- इनडिझाईन
- क्वॉर्क
- ज्ञान आवश्यक

- वर्धा जिल्हा वर्धा शहर, हिंगणघाट, आर्वी, देवळी, सेलू, कारंजा इ.
- गोंदिया गोंदिया, तिरोडा, अर्जुनी मोरगाव, देवरी, आमगाव इ.
- भंडारा भंडारा, तुमसर, पवनी, साकोली, लाखांदूर इ.
- गडचिरोली जिल्हा प्रतिनिधी गडचिरोली, अहेरी, चामोर्शी, देसाईगंज (वडसा), एटापल्ली इ.
- वाशिम शहर कारंजा लाड, रिसोड, मालेगाव, मानोरा,

वरील तालुका जिल्हा प्रतिनिधीसाठी इच्छुक असणाऱ्यानी आपला बायोडाटा (Biodata) आणि आधार कार्डची प्रत खालील व्हॉट्सअ‍ॅप नंबरवर पाठवावी किंवा संपर्क साधावा.

**कुणाल गायकवाड (जिल्हा प्रतिनिधी) मो.9579367474**
**अमोल कंटाळे (संपादक ) मो 9975532291**